❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : ३२३ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



राज्यात ३४ लाखांहून अधिक भूजल पुनर्भरण संरचनांच्या निर्मितीचे उद्दिष्ट मे २०२७ पर्यंत पूर्ण करणार : देवेंद्र फडणवीस

जलसंचय : जनभागीदारी अभियानांतर्गत जलयुक्त शिवार ३.० ची १८ हजार गावांत अंमलबजावणी

■ मुंबई (दै. संध्या)

पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवून भूजल पातळी वाढविणे, जुन्या जलसंधारण संरचनांचे पुनरुज्जीवन करणे आणि नव्या संरचनांची निर्मिती करणे, यासाठी राज्य शासनाने व्यापक कृती आराखडा तयार केला आहे. केंद्र शासनाच्या जलसंचय : जनभागीदारी अभियानांतर्गत राज्यात मे २०२७ पर्यंत ३४ लाख ८३ हजार ९४० भूजल पुनर्भरण संरचनांची निर्मिती पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने आणि निश्चित उद्दिष्टानुसार काम करावे,असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे जलशक्ती अभियान (जलसंचय: जनभागिदारी 3.0) राबविण्याबाबत बैठक झाली या बैठकीस वर्षा या शासकीय निवासस्थान येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी झाले होते. बैठकीस पुणे येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे केंद्रीय जलशक्ती राज्यमंत्री राज भूषण चौधरी सहभागी झाले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, एल निनोच्या प्रभावामुळे महाराष्ट्रासमोर दुष्काळाचे मोठे संकट निर्माण



झाले आहे. राज्यातील जवळपास ९० टक्के भाग दुष्काळाच्या झळा सोसत असून, पिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. आगामी काळात पिण्याच्या पाण्याची मागणी वाढण्याची शक्यता आहे. या संकटाचे संधीत रूपांतर करण्याच्या दृष्टीने जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्यात येत आहे. जुन्या जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन, तलावांची दुरुस्ती, शेततळी आणि पुनर्भरण खड्ड्यांची निर्मिती यावर विशेष भर देण्यात येत आहे. राज्य शासनाची महत्वाकांक्षी जलयुक्त शिवार योजना तिसऱ्या टप्प्यात राबविण्यात येणार असून, त्यासाठी १८ हजार गावांची निवड करण्यात आली आहे. जलयुक्त शिवार ३.०, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, मनरेगा तसेच इतर योजनांमधील निधी आणि कामांचे एकत्रिकरण करून जलसंधारणाची कामे अधिक प्रभावीपणे राबविण्यात येतील. या कामांचे शास्त्रीय पद्धतीने नियोजन, मॅपिंग आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे

विशेष निधीची मागणी

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर विद्यमान जलसंधारण संरचनांची दुरुस्ती, तलावांचे पुनरुज्जीवन, शेततळी आणि पुनर्भरण खड्ड्यांची निर्मिती यासाठी केंद्र शासनाकडे विशेष आर्थिक मदतीची मागणी करण्यात आली आहे. राज्याच्या दुष्काळी परिस्थितीचा विचार करून केंद्र शासनाने प्रचलित निकषांच्या पलीकडे जाऊन मदत करावी, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, जलसंधारणाच्या कामांसाठी ग्रामविकास, वन, सार्वजनिक बांधकाम, नगरविकास, कृषी आणि पाणीपुरवठा विभागांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली सर्व विभागांनी एकत्रितपणे काम करावे. वन विभागामार्फत वनबंधारे आणि वनतळ्यांची निर्मिती, तर सार्वजनिक बांधकाम व नगरविकास विभागामार्फत खासगी घरे तसेच शासकीय इमारतींवर छतावरील पावसाचे पाणी साठविण्याच्या (रूफटॉप रेनवॉटर हार्वेस्टिंग) उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.

मुंबईत वाहतूक कोंडी कमी होणार

एमएमआरडीएच्या दोन पायाभूत प्रकल्पांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर सादरीकरण

■ मुंबई (दै. संध्या)

मुंबई महानगर प्रदेशातील प्रवास वेगवान आणि अखंड करण्यासाठी वांद्रे-वरळी सागरी सेतूपासून ते वांद्रे-कुर्ला संकुल ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाचे टर्मिनल-२ आणि पूर्व द्रुतगती महामार्ग यांना जोडणारी एकात्मिक रस्ता बोगदा प्रणाली तसेच मुंबई ते वाढवण जोडणी प्रस्थापित करण्यासाठी भाईंदर/उत्तन ते विरार या मार्गाचा सुधारित आराखडा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोर सादर केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली एकात्मिक रस्ता बोगदा प्रणाली (पाताल लोक) तसेच मुंबई-वाढवण द्रुतमार्ग जोडणीसंदर्भात वर्षा शासकीय निवासस्थानी बैठक झाली. यावेळी नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, अतिरिक्त आयुक्त पी वेलारासू, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव, मुख्यमंत्री यांचे मुख्य आर्थिक व गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती आदि उपस्थित होते. एमएमआरडीएच्या वतीने सादर करण्यात आलेल्या एकात्मिक रस्ता बोगदा प्रणालीचा एका दिशेचा मार्ग सुमारे ३१

■ पूर्व-पश्चिम जोडणीसाठी एकात्मिक बोगदा प्रणाली (पाताल लोक) आणि उत्तन ते विरार या मार्गाचा सुधारित आराखडा सादर



किलोमीटरचा असून या प्रकल्पामुळे वांद्रे-वरळी सागरी सेतू, बीकेसीतील बुलेट ट्रेन स्थानक, धारावी, वांद्रे-कुर्ला संकुल, मुंबई विमानतळ, पश्चिम द्रुतगती महामार्ग आणि पूर्व द्रुतगती महामार्ग यांना प्रवेश व निर्गमन मार्गांद्वारे जोडण्याचे नियोजन आहे. या मार्गामुळे पूर्व आणि पश्चिम द्रुतगती महामार्गांसह बीकेसी व विमानतळाला थेट जोडणी मिळणार आहे. मुंबई-वाढवण द्रुतगतीमार्ग जोडणीच्या भाईंदर/उत्तन-विरार सागरी सेतू प्रकल्पाला यापूर्वीच मान्यता मिळाली होती. यासंदर्भात या मार्गाच्या आरेखनाच्या दोन पर्यायांवर चर्चा करण्यात आली.

थोडक्यात...

आणखी ६ तालुके दुष्काळग्रस्त घोषित

मुंबई : दैनिक संध्या

राज्यात अपुऱ्या पावसामुळे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी राज्यातील 304 तालुके दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करण्यात आले होते. आता त्यामध्ये आणखी 6 तालुक्यांची भर पडली आहे. नाशिक, पालघर, रत्नागिरी आणि कोल्हापूर या चार जिल्ह्यांतील सहा तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे संबंधित तालुक्यांतील शेतकरी, शेतमजूर आणि नागरिकांना विविध सवलती व उपाययोजनांचा लाभ मिळणार आहे. यामध्ये जमीन महसुलात सूट, पीककर्जाचे पुनर्गठन, शेतीशी संबंधित कर्जांच्या वसुलीला स्थगिती, कृषिपंपांच्या वीजबिलात सवलत तसेच विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी अशा महत्त्वाच्या निर्णयांचा समावेश आहे. राज्यात यंदा अपेक्षित पाऊस न झाल्याने अनेक भागांमध्ये पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने भूजल पातळीत घट झाली असून, विहिरी आणि बोअरवेलच्या पाणीसाठ्यावरही परिणाम झाला आहे. परिणामी, शेतीसाठी पाणी उपलब्ध होण्यात अडचणी येत असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनत आहे. ग्रामीण भागात शेती, पशुधन आणि दैनंदिन गरजांसाठी पाण्याची उपलब्धता हा मोठा प्रश्न बनला आहे.

कितीही भरवलं तरी पोट भरत नाही : मोदी

नवी दिल्ली : दैनिक संध्या

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी देशातील मोठ्या उद्योगपतींना फटकारले. ते म्हणाले, 'तुमची भूक इतकी आहे की कितीही खाऊ घातले तरी पोट भरत नाही.' पंतप्रधानांनी सांगितले की, सरकारने कॉर्पोरेट कर ३० टक्क्यांवरून कमी करून २२ टक्के केला आणि १२ लाख रुपयांपर्यंतचे वार्षिक उत्पन्न करमुक्त केले. पण कंपन्यांनी कर्मचाऱ्यांचे पगार वाढवले का? कर्मचाऱ्यांची संख्या वाढवली का? ते म्हणाले की, कंपन्यांचा दृष्टिकोन असा आहे की, 'मोदीजी, तुम्ही करा, आम्ही फक्त पाहत राहू. असेच काम सुरू राहणार आहे का?' मोदी म्हणाले, 'गांधीजी स्वदेशी स्वीकारण्याचा संदेश देऊन गेले. एक शतक उलटून गेल्यानंतरही हा संदेश आजही प्रासंगिक आहे. अखेर उद्योगजगताला आजही स्वदेशी आणि आत्मनिर्भरतेचे महत्त्व का आठवण करून द्यावे लागत आहे. विचार करा, १०० वर्षे उलटून गेली आहेत. एवढ्या वर्षांनंतर आज मलाही तीच गोष्ट पुन्हा सांगावी लागत आहे. हे तुमचे यश आहे की अपयश? माझे म्हणणे मानू नका, किमान गांधीजींचे तरी माना भाऊ. पंतप्रधानांनी विकसित भारताचे उद्दिष्ट केवळ घोषणा नसून, एक संकल्प असल्याचे सांगितले. त्यांनी म्हटले की, १०० वर्षे वाट पाहण्याऐवजी पुढील १० वर्षांत देशाच्या विकासासाठी आपण काय योगदान देऊ शकतो, याचा विचार केला पाहिजे.

बालविवाह प्रतिबंधाची सर्व ३६ जिल्ह्यांत प्रभावी अंमलबजावणी करणार

■ मुंबई(दै. संध्या)

बालविवाह प्रतिबंधक कायद्याची राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांत प्रभावी अंमलबजावणी करण्यासह दत्तक विधान प्रक्रिया गतिमान करणे, बाल संरक्षण यंत्रणांचे सक्षमीकरण आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणावर विशेष भर देण्यात येणार आहे. या कामासाठी युनिसेफचे सहकार्य महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी युनिसेफच्या प्रतिनिधी सिंथिया मॅककॅफ्रे यांच्या सोबतच्या चर्चेदरम्यान मांडले. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी मंत्रालयात युनिसेफच्या प्रतिनिधी सिंथिया मॅककॅफ्रे यांच्याशी बाल संरक्षण, बालविकास आणि पोषण क्षेत्रातील भागीदारीच्या पुढील टप्प्याबाबत संवाद साधला. हंगामी स्थलांतरामुळे मुलींचे शिक्षण अर्धवट राहून बालविवाह होण्याच्या घटना निदर्शनास येत आहेत. हे प्रकार पूर्णतः थांबविण्यासाठी विभाग जनजागृतीसह प्रतिबंधात्मक कार्यवाही करीत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी महिला व बाल विकास विभागाच्या सचिव शैला ए., आयुक्त वर्षा लड्ढा, एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या आयुक्त माधवी सरदेशमुख यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्रातील



'जालना मॉडेल'चे दस्तऐवजीकरण करणाऱ्या आणि मुलांसाठी कुटुंब व समुदायाधारित संगोपन व्यवस्थेची माहिती देणाऱ्या 'किनशिप अँड कम्युनिटी-बेस्ड केअर प्लेबुक – स्टेइंग बॅक, मूव्हिंग फॉरवर्ड' या मार्गदर्शिकेचे लोकार्पण करण्यात आले. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, राज्यातील प्रत्येक बालक सुरक्षित, निरोगी आणि योग्य संगोपनासह मोठे व्हावे, यासाठी सर्व यंत्रणांनी संयुक्तपणे सक्षम व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. राज्यातील बालविवाहाचे प्रमाण १९.७ टक्क्यांपर्यंत कमी झाले आहे. नांदेड, जालना, बीड, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये बालविवाह रोखण्यासाठी विभाग विशेष प्रयत्न करीत आहे. बालविवाह प्रतिबंधक प्रतिनिधींचे जिल्हास्तरीय संघटन उभारणे, राज्यस्तरीय कृती आराखडा तयार करणे तसेच बालविवाह पीडित बालकांना समुपदेशन आणि पुनर्वसनाच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाईल.

शासकीय तलाव परिसरातील अतिक्रमणांवर कारवाई

■ अंदाजे ३५ कोटी रुपये किमतीची शासकीय जमीन अतिक्रमणमुक्त

■ मुंबई (दै. संध्या)

मौजे कांदिवली येथील शासकीय तलाव परिसरातील अतिक्रमणांवर मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत अन्य प्रशासकीय यंत्रणांच्या समन्वयाने कारवाई करण्यात आली.

मौजे कांदिवली येथील न. भू. क्र. १ ब या शासकीय मिळकतीवरील तलावाचे तसेच कांदळवनाचे जतन, संवर्धन आणि सुशोभीकरण करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्र. १७९०/२०२१ दाखल केली होती. मुंबई उच्च न्यायालयाने २१ जुलै २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांना तलावाभोवतालची अतिक्रमणे निष्कासित करण्याचे आदेश दिले होते.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मौजे कांदिवली येथील साईधाम नगरमधील ५२९ झोपड्या आणि मौजे बोरिवली येथील ४२६ झोपड्यांचे वनविभाग, नगर भूमापन कार्यालय तसेच उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण निष्कासन), बोरिवली-१ यांच्या कार्यालयामार्फत सर्वेक्षण करण्यात आले. एकूण ९५५ अतिक्रमणधारकांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ५० (३) अन्वये नोटिसा बजावण्यात आल्या.



यापैकी ९१५ अतिक्रमणधारकांनी २०११ पूर्वीचे पुरावे सादर केले आहेत. या अतिक्रमणधारकांची पात्रता निश्चित करण्याचे अधिकार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना असल्याने त्यांची प्रकरणे पात्रता निश्चितीसाठी प्राधिकरणाकडे पाठविण्यात आली आहेत. उर्वरित ३९ अतिक्रमणधारकांनी २०११ पूर्वीची कागदपत्रे सादर न केल्यामुळे त्यांची अतिक्रमणे १८ नोव्हेंबर २०२६ रोजी निष्कासित करण्यात आली.

ही कारवाई झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार आणि अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण निष्कासन), पश्चिम उपनगरे, गणेश मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या मोहिमेत महसूल विभाग, मुंबई पोलीस, बृहन्मुंबई महानगरपालिका, अग्निशमन दल, वाहतूक पोलीस, नगर भूमापन कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि अदानी इलेक्ट्रिसिटीचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले. उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण निष्कासन), बोरिवली-१, उज्ज्वला भगत यांच्या नियोजनाखाली ही कारवाई पार पडली.

'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'चा २६ नोव्हेंबरला शुभारंभ

पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रारंभ

■ योजना पूर्णतः ऑनलाइन; त्याच दिवसापासून करता येणार अर्ज

■ ग्रामीण युवकांना उद्योजकतेकडे नेणारी महत्त्वाकांक्षी योजना

■ मुंबई (दै. संध्या)

ग्रामीण भागातील युवक, शेतकरी आणि युवतींना पशुधनाधारित व्यवसायांद्वारे उद्योजकतेची संधी उपलब्ध करून देणाऱ्या 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'चा शुभारंभ संविधान दिनी, २६ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आलेली ही योजना पूर्णतः ऑनलाइन स्वरूपात राबविण्यात येणार असून, शुभारंभाच्या दिवसापासून इच्छुकांना अर्ज करता येणार आहेत, अशी माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यासंदर्भात अधिक माहिती देताना पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, पशुसंवर्धन विभागाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण युवकांना उद्योजक बनविण्याच्या उद्देशाने ही महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली आहे. ग्रामीण युवकांना उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देणे, त्यांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून सकारात्मक आणि स्वयंपूर्णतेच्या दिशेने मार्गस्थ करणे, तसेच दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण भागाला दिलासा



देणे, हा या योजनेमागील उद्देश आहे. योजनेच्या पूर्वतयारीसाठी विभागाने बारकाईने व व्यापक प्रमाणात कामे केली असून, विविध जिल्ह्यांमध्ये प्रशिक्षणही देण्यात आले आहे. या प्रशिक्षणांमध्ये हजारोंच्या संख्येने नागरिकांनी सहभाग नोंदविला आहे. शासकीय सॉफ्टवेअर व तंत्रज्ञानविषयक कामकाज महाआयटीच्या माध्यमातून करण्याच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार, या योजनेसाठीची ऑनलाइन प्रणाली विकसित करण्याची जबाबदारी महाआयटीकडे सोपविण्यात आली होती. पशुसंवर्धन विभाग आणि महाआयटी यांनी समन्वयाने ही प्रणाली विकसित केली असून, तिच्या विविध चाचण्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. योजनेतील अर्ज, माहितीची नोंद, प्रकल्प निवड, खर्चाचा अंदाज आणि अनुदानासंदर्भातील प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी अर्जापूर्वी आपला फार्मर आयडी आणि महाआयडी तयार करून घ्यावा, असे आवाहन मंत्री मुंडे यांनी केले आहे. या ओळखपत्रांच्या निर्मितीसंदर्भातील माहिती पशुसंवर्धन विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. योजनेची संपूर्ण

योजनेअंतर्गत अर्जदाराला आपल्या व्यवसायाच्या गरजेनुसार विविध पर्याय निवडता येणार आहेत. गाय आणि म्हैस यांसारख्या मोठ्या पशुधनासह शेळीपालन, कुक्कुटपालन तसेच वराहपालन या घटकांसाठी अर्ज करता येईल. काही भागांमध्ये वराहपालनाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जात असल्याने या घटकाचाही योजनेत समावेश करण्यात आला आहे. वराहपालनासंदर्भात काही ठिकाणांहून निर्यातीची मागणीही प्राप्त झाली आहे. संबंधित व्यवसायासाठी आवश्यक असलेले शेड तसेच हायड्रोपोनिक चारा व्यवस्थेचे पर्यायही अर्ज प्रक्रियेत उपलब्ध असतील, असेही त्यांनी सांगितले.

प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. ऑनलाइन अर्जामध्ये अर्जदाराने निवडलेल्या पशुधन व आवश्यक सुविधांनुसार प्रकल्पाचा खर्च प्रणालीद्वारे निश्चित करण्यात येईल. संबंधित प्रकल्पासाठी लागू असलेली अनुदानाची रक्कम वजा करून उर्वरित गुंतवणुकीची रक्कम अर्जदारास ऑनलाइन प्रणालीवर दर्शविण्यात येईल. अर्जदाराला प्रकल्पाशी संबंधित खर्च व अनुदानाची रक्कम अर्ज प्रक्रियेदरम्यान उपलब्ध होणार आहे, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

एकनाथ शिंदेंच्या हेलिकॉप्टरमध्ये बिघाड

■ पंढरपूर (दै. संध्या)

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हेलिकॉप्टरमध्ये पंढरपुरात अचानक तांत्रिक बिघाड झाल्याची घटना घडली. कार्तिकी वारीच्या नियोजनाचा आढावा घेण्यासाठी एकनाथ शिंदे गुरुवारी पंढरपूर दौऱ्यावर आले होते. दौऱ्यातील कार्यक्रम आणि पाहणी पूर्ण करून ते मुंबईला परतण्यासाठी हेलिपॅडवर पोहोचले. मात्र, हेलिकॉप्टर सुरू करण्याचा प्रयत्न केला असता त्यामध्ये तांत्रिक अडचण निर्माण झाली. हेलिकॉप्टरची बॅटरी लो झाल्यामुळे त्याचे दुसरे इंजिन सुरू होत नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे ऐनवेळी त्यांचा हेलिकॉप्टरने मुंबईला जाण्याचा नियोजित प्रवास रद्द करावा लागला. अखेर एकनाथ शिंदे यांनी कारने पुण्याकडे जाण्याचा निर्णय घेतला. पुणे विमानतळावरून विमानाने ते मुंबईला रवाना होणार आहेत. कार्तिकी यात्रेच्या नियोजनाची पाहणी करण्यासाठी एकनाथ शिंदे गुरुवारी पंढरपूरमध्ये दाखल झाले होते. सकाळी साधारण 11 ते 11.30 वाजण्याच्या सुमारास त्यांचे पंढरपुरात आगमन झाले. यावेळी त्यांनी मंदिर परिसरातील व्यवस्था, चंद्रभागा नदी परिसर आणि कार्तिकी वारीच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या तयारीचा आढावा घेतला. तसेच संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन यात्रेच्या नियोजनाबाबत माहिती जाणून घेतली. या दौऱ्यात जिल्ह्यातील पदाधिकारी, आमदार आणि नगराध्यक्षही उपस्थित होते. सर्व कार्यक्रम आणि पाहणी पूर्ण झाल्यानंतर शिंदे मुंबईकडे रवाना होण्यासाठी हेलिपॅडवर पोहोचले होते. एकनाथ शिंदे हेलिकॉप्टरमध्ये बसल्यानंतर ते सुरू करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

संपादकीय

राजकारणाच्या दिखाव्यात दुष्काळाकडे दुर्लक्ष करू नका!

राज्यात यंदा पावसाने साथ न दिल्याने मराठवाडा विदर्भासह, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, व उर्वरित महाराष्ट्रात दुष्काळाचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत चाललेले आहे. पावसाळा संपून दोन महिने झाले नसतानाच राज्याच्या काही भागांमध्ये, गावांमध्ये, पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची वणवण सुरू झालेली आहे. धरणामधील, तलावामधील, व छोट्या बंधाऱ्यातील पाण्याचा साठा घटू लागलेला आहे. त्यामुळे शेतातील विहिरी आटू लागलेल्या आहेत. पाण्याची टंचाई सोसणारी गावे, आणि जनावरांसाठी चाऱ्याची टंचाई ही आगामी सात आठ महिन्यासाठी भीषण संकटाची चाहूल आहे. राज्यातील ३०८ हून अधिक तालुक्यात सरसकट दुष्काळ जाहीर करण्याची वेळ सरकारवर आलेली आहे. राज्यातील३००० हून अधिक धरणांमध्ये १७ नोव्हेंबर अखेर साधारण ६४ टक्के पाणीसाठा असल्याचे जलसिंचन विभागाने सांगितलेले आहे. गेल्या वर्षी याच तारखेला राज्यातील सर्व धरणात साधारण ९० टक्के होवून अधिक पाणीसाठा होता. यावरून दुष्काळाची तीव्रता लक्षात आल्याशिवाय राहत नाही. विशेष म्हणजे लघु प्रकल्पांमध्ये अवघा ३८टक्के, तर मध्यम प्रकल्पामध्ये ५०टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मराठवाड्यात सुरुवातीपासूनच पाऊस कमी असल्याने तेथील धरणातील पाण्याचा साठा हा ३०टक्केपेक्षाही कमी आहे. त्यामुळे मराठवाड्यातील परिस्थिती अधिकच बिकट झालेली आहे. विदर्भातील काही भागांमध्ये तीव्र दुष्काळ, पाणीटंचाई, शेतात उत्पन्न नाही, खाजगी सावकारांचे,व बँकांचे कर्जाची थकबाकी, यामुळे विदर्भामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढत चाललेले आहे. या दुष्काळाची तीव्रता एवढी भयानक आहे की याची झळ मुंबई, ठाणे, सह पुणे, नाशिक महानगराला बसण्याची शक्यता आहे. मुंबई पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांचा साठा दिवसेंदिवस कमी होत असल्याने तेथे पाणीकपातीची अंमलबजावणी सुरू होण्याच्या मार्गावर आहे. यावरून दुष्काळाचे संकट ग्रामीण भागाबरोबर शहरी भागालाही सोसावे लागणार आहे. पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देताना औद्योगिक क्षेत्रात होणारा पाण्याचा वापर, बांधकामासाठी, व इतर गरजांसाठी,होणारा पाण्याचा अमर्याद वापर यावर निर्बंध घालून शिस्त लावावी लागणार आहे. दुष्काळाचे संकट व त्याचे गंभीर परिणाम शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होतात. पाण्याअभावी रब्बी हंगामातील पेरण्या, पिकाची वाढ, आणि उत्पादन, यावर गंभीर परिणाम झालेला आहे. जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता हा मोठा प्रश्न बनू शकतो.चारा उत्पादन घटल्यास पशुपालकांना जनावरे सांभाळणे कठीण होईल. परिणामी जनावरांची विक्री, जनावरांचे स्थलांतर,आणि ग्रामीण कुटुंबियांच्या उत्पादनात घट, असे दुष्परिणाम समोर येतील. त्यामुळे चारा छावण्या सुरू करण्याची वेळ येण्यापूर्वीच चारा बँक उभारणे, चारा लागवडीसाठी बियाणे उपलब्ध करणे, आणि पशुखाद्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. सरकारने जाहीर केलेल्या दहा उपाययोजनाची काटेकोरपणे अंमलबजावणी युद्ध पातळीवर होणे गरजेचे आहे. टँकरद्वारे पाणीपुरवठा, विहीरी आणि बोअरवेल ची दुरुस्ती, नवीन पाणीपुरवठा योजना, जलजीवन विभागाची अपूर्ण कामे पूर्ण करणे. याला प्राधान्यक्रम द्यावा लागेल. मात्र टँकरवर अवलंबून राहणे हा कायमस्वरूपी उपाय नाही. त्यासाठी गळती रोखणे, पाण्याचा पुनर्वापर करण्याच्या प्रक्रिया, स्थानिक उपलब्ध पाणी स्तोत्राचे पुनर्जीवन करणे, यासाठी ठोस कारवाई कार्यवाही होणे गरजेचे आहे. शिरपूर पॅटर्न प्रमाणे जलसंधारणाची कामे प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात, गावात, राबवण्याचे सूचनेचे स्वागत आहे, मात्र त्यासाठी केवळ निधीची तरतूद करून उपयोग नाही तर त्या कामाची गुणवत्ता, आणि टिकाऊपणा याकडेही जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे. दुष्काळामुळे शेतातील कामे कमी झाल्याने शेतमजुरांना रोजगारासाठी काम देणे आवश्यक आहे.त्यासाठी ग्रामीण भागात रोजगार हमी योजनेअंतर्गत जलसंधारण जलसंधारण, शेततळी, नाला खोलीकरण, नाला बंधारे, बंधाऱ्यातील गाळ काढणे, आणि वृक्ष लागवड, यासारखी कामे मोठ्या प्रमाणावर हाती घ्यावी लागतील. शेतकऱ्यांना पिक विमा,नुकसान भरपाई, कर्ज वसुलीला स्थगिती,आणि पुढील हंगामासाठी बियाणे व खताचे उपलब्धतेपासून आवश्यक निर्णय घेण्याची गरज आहे.दुष्काळ हा केवळ नैसर्गिक संकट नसून तो सत्ताधारी मंडळीची व प्रशासनाची नियोजनाच्या माध्यमातून क्षमतेची परीक्षा घेत असतो.हवामान बदलामुळे पावसाचा अनियमितता, आणि अतिवृष्टी, कोरड्या कालावधीचे वाढते चक्र लक्षात घेता दीर्घकालीन जल व्यवस्थापन धोरण आखावे लागेल. पाणलोट क्षेत्र विकास,भूजल पुनर्भरण, पीक पद्धतीतील बदल, आणि कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. अन्यथा दरवर्षी दुष्काळ जाहीर करणे , टँकर सुरू करणे एवढ्या पुरतेच सरकारचे धोरण मर्यादित राहील. त्यामुळे सरकारने दुष्काळाची तीव्रता वाढण्याची वाट न पाहता पाणी, चारा, शेती, आणि रोजगार,या चारही आघाड्यावर एकाच वेळी उपाय योजना कराव्यात, निधीची उपलब्धता, प्रशासनातील समन्वय,आणि कामाची प्रत्यक्ष अंमलबजावणी, याचा वेग वाढवावा. आज घेतलेले निर्णय आगामी उन्हाळ्यातील ग्रामीण आणि शहरी महाराष्ट्राचे भवितव्य ठरवणार आहे. दुष्काळ जाहीर करण्यापेक्षा दुष्काळाचा परिणाम कमी करण्याची राजकीय प्रबळ इच्छाशक्ती, आणि प्रशासकीय तत्परता दाखवणे हीच सरकार पुढील खरी कसोटी आहे. खरंतर दुष्काळ हा अनपेक्षित नव्हताच, हे निनोचे संकट उंबरठ्यावर आहे हे माहीत असूनही सरकारने व प्रशासनाने संभाव्य पूर्वतयारी केलेली दिसत नाही. जल नियोजन असो शेतकऱ्यांच्या पिकांचा, कर्जाचा, उपजिवीकेचा प्रश्न असो, अथवा जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न, कशाचेही पूर्व नियोजन प्रशासनाने व राज्यकर्त्यांनी केलेले दिसत नाही. विदर्भातील अमरावती विभागात शेतकरी आत्महत्याचे प्रमाण वाढल्याचे समोर आले आहे, व येत आहे. केवळ पत्रकार परिषदा घेऊन कर्ज वसुलीसाठी आलेल्यांना सरकारकडे पाठवा असे म्हटल्याने भागणार आहे काय?... दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सरकारने रिझर्व बँकेच्या माध्यमातून कर्ज वसुलीच्या नियमांमध्ये शिथिलता आणण्यासाठी एखादा अध्यादेश जारी करण्याची आवश्यकता होती, पण तो तसा केलेला दिसत नाही?... या कठीण प्रसंगात महाराष्ट्र सरकारचे पुढील प्राधान्याचे प्रश्न तरी कोणते असावेत? कुंभमेळ्याचे ध्वजारोहण?.. त्यासाठी आहे त्या पाण्याचा उपयोग करण्यासाठी सरकार तयार आहे?.. एकीकडे जलकपात अंमलात आणत असताना कोट्यवधी लिटर तहान असलेल्या परदेशी उद्योजकांना व त्यांच्या केंद्रांना प्रोत्साहन दिले जात आहे. कर्जत, तारळी, प्रकल्पासाठी बेसुमार जंगलतोड, पर्यावरणीय विभागाच्या परवानगीशिवाय प्रकल्प रेटणे, खर्चाच्या आकड्याची लपवाछपवी करणे,पितळ उघडे पडल्यावरही सारवासारव करण्याचा केविलवाना प्रकार, गोकुळ दूध संघातील निवडणूक चोरी, यातच सरकार मग्न आहे?.. शेतकऱ्यांना, मजुरांना, गुराढोरांना, मदत देण्याची सरकारची खरोखर इच्छा आहे काय?... सरकारला केवळ मदतीचा देखावा निर्माण करण्यात रस आहे काय?असा सर्वसामान्यांना प्रश्न पडलेला आहे.

पुण्यात 'रेफकोल्ड इंडिया २०२६' प्रदर्शनाचे दिमाखात उद्घाटन

कोल्ड चेनच्या व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळणार - कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

■ २०० हून अधिक स्टॉल्समधून आधुनिक, ऊर्जा कार्यक्षम व पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचे सादरीकरण

■ पुणे (दै. संध्या)



रेफ्रिजरेशन आणि कोल्ड चेन क्षेत्रातील दक्षिण आशियातील भव्य आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व परिषद 'रेफकोल्ड इंडिया २०२६'चे उद्घाटन महाराष्ट्राचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते ॲग्रिकल्चर कॉलेज ग्राउंड येथे झाले. इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग, रेफ्रिजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स (ISHRAE) यांच्या वतीने आयोजित या तीन दिवसीय प्रदर्शनात २०० हून अधिक स्टॉल्सच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञान, ऊर्जा कार्यक्षम प्रणाली आणि पर्यावरणपूरक उपाययोजनांचे सादरीकरण करण्यात आले आहे. यावेळी पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, विभागीय आयुक्त शीतल उगले-तेली, कृषी आयुक्त सुरेश मांढरे, साखर आयुक्त संजय कोलते, कृषी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुभाष भालेकर, ISHRAEचे अध्यक्ष डॉ. सरवानन, रेफकोल्ड इंडिया २०२६चे अध्यक्ष अरविंद सुरंगे, सुनील पवार, अमन किर्लोस्कर, दीपक वाणी, रमेश परांजपे, चंद्रशेखर, संयोजक वीरेंद्र बोराडे आणि सहसंयोजक नंदकिशोर कोतकर आदी मान्यवर उपस्थित होते. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, की सर्वच क्षेत्रांत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ही काळाची गरज आहे. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाच्या साठवणुकीची योग्य व्यवस्था नसल्याने त्यांना अपेक्षित भाव मिळत नाही. कोल्ड चेन व्यवस्थेच्या विस्तारामुळे शेतकऱ्यांना भविष्यात मोठा आर्थिक लाभ होऊ शकतो. प्रदर्शने, उद्योग, तंत्रज्ञान आणि शासन यांनी एकत्रितपणे काम केल्यास उद्योगनिर्मितीला चालना मिळेल आणि नवउद्योजकांसाठी नवीन संधी निर्माण होतील.

अरविंद सुरंगे म्हणाले, की रेफ्रिजरेशन आणि संलग्न उद्योगांतील उत्पादक कंपन्या, तज्ज्ञ अभियंते, डिझायनर्स, सल्लागार, कंत्राटदार आणि शैक्षणिक संस्थांचे भक्कम जाळे असल्यामुळे पुण्याला देशाची 'रेफ्रिजरेशन कॅपिटल' म्हणून ओळखले जाते. या क्षेत्राच्या विकासात ISHRAEच्या पुणे विभागाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

ISHRAEचे अध्यक्ष डॉ. सरवानन यांनी महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त नागरिकांच्या मदतीसाठी संस्थेतर्फे पाच लाख रुपयांची देणगी देण्याची तसेच तीन पीएच.डी. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची घोषणा केली. या प्रदर्शनात रेफ्रिजरेशन, कोल्ड चेन, ऊर्जा कार्यक्षम प्रणाली, स्मार्ट तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक उपाययोजनांसह विविध उत्पादनांचे सादरीकरण करण्यात आले आहे. याशिवाय तज्ज्ञांची व्याख्याने, परिसंवाद, पॅनेल चर्चा, रेफकोल्ड पुरस्कार, ग्लोबल पोस्टर स्पर्धा तसेच महिला सदस्य आणि उद्योजकांसाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

हे प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी श्री चेतन ठाकूर, डॉक्टर नितीन देवधर श्रीयुत अमित गुलवडे, विमल चावडा, आशुतोष जोशी, सुबोध मुर्केवार यांनी मोठे योगदान दिले. उद्घाटन सोहळ्याचे प्रास्ताविक वीरेंद्र बोराडे यांनी केले. सुभाष खनाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. हे प्रदर्शन २१ नोव्हेंबरपर्यंत दररोज सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत सर्वांसाठी खुले राहणार आहे.

कार्तिकी यात्रेत ग्रामीण भागात वास्तव्यास असणाऱ्या वारकऱ्यांची कोणतीही गैरसोय होणार नाही



■ आळंदी (दै. संध्या)

श्रीक्षेत्र आळंदी येथे होणाऱ्या कार्तिकी यात्रा २०२६ च्या पार्श्वभूमीवर आळंदीसह लगतच्या ग्रामीण भागातील वारकऱ्यांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. केळगाव, चऱ्होली आणि धानोरे या गावांमध्ये वास्तव्यास असणाऱ्या लाखो वारकरी व भाविकांच्या सुविधांसाठी जिल्हा परिषद पुणे येथे महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली.

जिल्हा परिषद पुणेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, मुख्य आळंदीच्या कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, कृषी व पशुसंवर्धन सभापती अमोल नलावडे यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीस आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, विश्वस्त योगी निरंजननाथ, चैतन्य महाराज लोंढे (कबीर बुवा) आणि संजय घुंडरे पाटील उपस्थित होते. बैठकीत यात्राकाळात ग्रामीण भागातील स्वच्छता, आरोग्यसेवा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, घनकचरा व्यवस्थापन आणि अग्निसुरक्षा या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. ग्रामीण भागात वास्तव्यास असणाऱ्या वारकऱ्यांची कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे सकारात्मक आश्वासन जिल्हा परिषद प्रशासनाकडून देण्यात आले.

कार्तिकी यात्रेसाठी राज्यभरातून लाखो भाविक आळंदीत दाखल होत असतात. या भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सोयीस्कर वातावरण मिळावे, यासाठी आळंदी नगरपरिषद, श्री क्षेत्र आळंदी देवस्थान आणि जिल्हा परिषद पुणे यांच्या समन्वयातून यात्रेचे नियोजन करण्यात येणार आहे.

बाभूळसर बु॥ येथे पंडित जवाहरलाल नेहरू (बालदिन) निमित्त सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली सुरुवात

■ बाभूळसर बु॥, ता.शिरूर जि. पुणे. (दै. संध्या)



सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आयोजित आणि श्री. शिवाजी नॉलेज सिटी संस्था, बाभूळसर बु॥ यांच्या संकल्पनेतून पंडित जवाहरलाल नेहरू (बालदिन) यांच्या जयंती निमित्त आयोजित विविध सांस्कृतिक कार्यक्रम सोमवार, दि. 16 नोव्हेंबर 2026 रोजी सायंकाळी 6:30 वाजता. ग्रामपंचायत समोर, बाभूळसर बु॥ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात गावातील ज्येष्ठ, प्रतिष्ठित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी दीपप्रज्वलनासाठी उपस्थित मान्यवर - श्री. रामअण्णा नागवडे, श्री. विलास बापू नागवडे, श्री. संतोष नारायण नागवडे, श्री. हनुभाऊ पाटोळे, श्री. अरुण दादा नागवडे, श्री. बाळासाहेब अर्जुन नागवडे, श्री. भरतभाऊ नागवडे, श्री. जगन्नाथ टेकवडे, श्री. रामभाऊ मचाले, श्री. पंकज साबळे, श्री. महिंद्रा रणदिवे, श्री. संतोष सगाजी नागवडे आणि पत्रकार दैनिक सकाळ, श्री. प्रमोल कुशेकर, पुण्य नगरी श्री. विठ्ठल गवळी सर, लोकमत दत्तात्रय कदम सर, पुढारी बहिरट साहेब, श्री.अल्लाउद्दीन आलवी. या सर्व मान्यवरांनी एकत्रितपणे दीपप्रज्वलन करून, पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास औपचारिक सुरुवात केली. दीपप्रज्वलनानंतर उपस्थित ग्रामस्थांनी टाळ्यांच्या गजरात मान्यवरांचे स्वागत केले. तसेच गावाच्या जडणघडणीत ज्यांचं मोलाचे योगदान आहे अशा सर्वांचा छत्रपती शिवाजी महाराजांची फ्रेम व शाल श्रीफळ गुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. पंडित जवाहरलाल नेहरू (बालदिन) या विषयावर व्याख्यान शुभम रोकडे यांनी केले. त्यांनी आपल्या ओघवत्या शैलीने संपूर्ण कार्यक्रम श्रोत्यांना खिळवून ठेवला. त्यानंतर प्रा. वसंत हंकारे सर यांचे आयुष्याला दिशा देणारे प्रेरणादायी व्याख्यान झाले. त्यांनी बालदिनाचे महत्त्व, नेहरूंचे बालप्रेम, शिक्षण, संस्कार आणि तरुण पिढीने घ्यायला हवी असलेली जबाबदारी यावर प्रकाश टाकला. त्यांच्या व्याख्यानाला उपस्थित विद्यार्थी, पालक आणि युवकांनी भरभरून प्रतिसाद दिला. या कार्यक्रमासाठी यांचे मार्गदर्शन लाभले. मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती.सुनेत्रा पवार सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार,यांच्या प्रेरणेतून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमास युवक, युवती शिक्षक, महिला,ग्रामस्थ बाभूळसर बु॥व पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समस्त ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे विनीत प्रशांत संगीता कैलास खेडेकर, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे होते. शेवटी सर्व मान्यवरांचे आभार रामआण्णा नागवडे यांनी मानले व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

इंदापूर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाला गती

■ ४१ पात्र प्रकल्पग्रस्तांना प्रत्येकी १०० चौ.मी. भूखंडाचे वाटप; सोडत प्रक्रियेत पारदर्शकतेवर भर

■ बारामती (दै. संध्या)



बारामतीत पारदर्शक भूखंड सोडत- हनुमंत पाटील

इंदापूर औद्योगिक क्षेत्रासाठी जमीन दिलेल्या प्रकल्पबाधित शेतकरी व प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) महत्त्वाचे पाऊल उचलले असून पात्र ४१ प्रकल्पग्रस्त अर्जदारांना प्रत्येकी १०० चौरस मीटर क्षेत्रफळाचे भूखंड वाटप करण्यासाठी पारदर्शक सोडत प्रक्रिया बुधवारी (दि. १८ नोव्हेंबर)बारामती प्रादेशिक कार्यालयात घेण्यात आली. उपजिल्हाधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि विशेष भूखंड वाटप समितीच्या उपस्थितीत सकाळी ११ वाजता सोडत प्रक्रियेला सुरुवात झाली. प्रकल्पग्रस्तांच्या मनातील शंका दूर व्हाव्यात आणि संपूर्ण प्रक्रियेत १०० टक्के पारदर्शकता रहावी, यासाठी प्रशासनाने काटेकोर नियोजन केले. बैठकीच्या सुरुवातीला उपस्थित सर्व प्रकल्पग्रस्त आणि त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींची ओळखपत्रे व कागदपत्रे तपासून स्वाक्षरीसह उपस्थिती नोंदविण्यात आली. त्यानंतर उपस्थितांच्या संमतीने पीपी ४१ ते पीपी ८९ या उपलब्ध भूखंड क्रमांकांच्या चिठ्ठ्या तयार करून त्या सर्वांसमक्ष पारदर्शक बरणीत टाकण्यात आल्या. कोणताही मानवी हस्तक्षेप होऊ नये, यासाठी इयत्ता तिसरीतील एका लहान बालकाच्या हस्ते चिठ्ठ्या काढण्यात आल्या. यादीनुसार क्रमांकाने अर्जदारांना भूखंडांचे वाटप जाहीर करण्यात आले. या अभिनव पद्धतीमुळे सोडत प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक झाल्याचे उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. या सोडत प्रक्रियेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्र व्यवस्थापक महेश बळाळ, उपरचनाकार प्रांजली मंडलिक, सहायक क्षेत्र व्यवस्थापक सागर पाटील आणि प्रमुख भूमापक बाळाजी निलेदार यांनी विशेष परिश्रम घेतले. बैठकीच्या शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानून भूखंड वाटपाची प्रक्रिया पूर्ण झाल्याची माहिती देण्यात आली. या प्रक्रियेमुळे इंदापूर औद्योगिक क्षेत्रातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाला गती मिळणार असून, पात्र लाभार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.



प्रशासनाकडून माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना जयंतीनिमित्त अभिवादन

■ बारामती (दै. संध्या)

भारताच्या माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त बारामती प्रशासनाच्या वतीने उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्त उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकात्मतेची शपथ घेतली. इंदिरा गांधी यांच्या स्मृतींना अभिवादन करताना देशाची एकता, अखंडता आणि बंधुभाव जपण्याचा संकल्प करण्यात आला. राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा आणि देशाच्या प्रगतीसाठी प्रत्येक नागरिकाने आपले योगदान द्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

सामूहिक बदलीची मागणी मान्य करून दोषी कर्मचाऱ्यांची थेट गडचिरोलीला रवानगी करा!

■ जिल्हाध्यक्ष विकास क्षत्रिय यांचा संतप्त सवाल

■ नागरिकांची कामे पैशांशिवाय होत नसल्याचा आरोप

■ इंदापूर (दै. संध्या)



इंदापूर तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी सामूहिक बदलीसंदर्भात तहसीलदारांना निवेदन दिल्याची माहिती समोर येत असताना,या प्रकरणावर माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे पुणे जिल्हाध्यक्ष विकास क्षत्रिय यांनी आक्रमक भूमिका मांडली आहे. तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांची केवळ तालुक्याबाहेर नव्हे, तर जिल्ह्याबाहेर सामूहिक बदली करण्याची मागणी केली आहे. जर तहसील कार्यालयातील कोणताही कर्मचारी सामाजिक कार्यकर्ते किंवा माहिती अधिकार कार्यकर्ते पैशांची मागणी करत असल्याचा आरोप करत असेल, तर संबंधित कर्मचाऱ्यांनी पुराव्यासह इंदापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून खंडणीचा गुन्हा नोंदविण्याची मागणी करावी.मात्र त्याचबरोबर नागरिकांच्या तक्रारींचीही निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे,अशी भूमिका विकास क्षत्रिय यांनी मांडली. इंदापूर तहसील कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांची मुजोर कार्यपद्धती वाढत असल्याचा आरोप करत क्षत्रिय म्हणाले की, सर्वसामान्य नागरिकांना आपल्या शासकीय कामांसाठी वारंवार कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत असतील आणि पैसे दिल्याशिवाय कामे होत नसल्याच्या तक्रारी येत असतील, तर अशा व्यवस्थेला आळा घालणे आवश्यक आहे. तालुक्यातील स्थानिक कर्मचाऱ्यांची तर प्राधान्याने बदली करण्यात यावी.

नागरिकांची कामे प्रलंबित ठेवून आर्थिक अपेक्षा ठेवणाऱ्या कर्मचाऱ्यांना जवळपास बदली देण्याऐवजी गडचिरोलीसारख्या जिल्ह्यात बदली करण्यात यावी, अशी स्पष्ट आणि आक्रमक मागणी विकास क्षत्रिय यांनी केली आहे.

शासकीय कार्यालये ही सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी आहेत, कर्मचाऱ्यांच्या मर्जीने चालणारी खासगी कार्यालये नाहीत. त्यामुळे सामूहिक बदलीच्या मागणीमागील नेमकी कारणे काय आहेत, कर्मचाऱ्यांच्या कामकाजाबाबत नागरिकांच्या तक्रारी किती आहेत आणि त्यांची चौकशी कोण करणार, असे सवालही उपस्थित होत आहेत.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



कर्तव्य बजावताना अपंगत्व आलेल्या जवानांसोबत भाऊबीज साजरी

■ खडकी येथील अपंग सैनिक पुनर्वसन केंद्रात सैनिकांसोबत भाऊबीज : सैनिक मित्र परिवार आणि सहयोगी संस्थांच्या वतीने आयोजन

पुणे : दैनिक संध्या

देशसेवा बजावताना गंभीर दुखापतीमुळे अपंगत्व आलेल्या जवानांना दिवाळीच्या सणात कुटुंबाची उणीव भासू नये, या भावनेतून खडकी येथील अपंग सैनिक पुनर्वसन केंद्रात (पॅराप्लेजिक रिहॅबिलिटेशन सेंटर) भाऊबीज साजरी करण्यात आली. भारत माता की जय... च्या घोषणांनी यावेळी परिसर दुमदुमून गेला. सैनिक मित्र परिवार आणि सहयोगी संस्थांच्या वतीने आयोजित या सोहळ्याला ज्येष्ठ नृत्यांगना सुरेखा पुणेकर, लेखिका सुनेत्रा मंकणी आणि राष्ट्रीय खेळाडू शकुंतला खटावकर, केंद्राचे कर्नल आर. के. मुखर्जी, कर्नल बी.एल. भार्गव आदी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते जवानांचे औक्षण करण्यात आले. कपाळावर टिळा लावून आणि दिवाळीचा फराळ देऊन जवानांप्रती स्नेह व्यक्त करण्यात आला. सिमरन गुजराथी, तृप्ती पाटील, ललिता जळगावकर, कल्याणी सराफ, श्रेया फाटक, आरती नाईक, सुप्रिया तांबट आदिंनी कार्यक्रमाच्या संयोजनात सहभाग घेतला. देशसेवेसाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या जवानांच्या पाठीशी संपूर्ण समाज उभा असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. औक्षणानंतर जवानांच्या मनोरंजनासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गायन, संगीत आणि संवादाच्या माध्यमातून कार्यक्रमात रंगत आली. जवानांनीही या कार्यक्रमात आनंदाने सहभाग घेतला. आयोजक आनंद सराफ म्हणाले, देशासाठी आपले आयुष्य समर्पित करणाऱ्या जवानांसोबत दिवाळीचा आनंद वाटून घेणे आणि जवानांना कुटुंबाची उणीव जाणवू नये आणि त्यांच्याप्रती समाजातील आदर व्यक्त व्हावा, या उद्देशाने दरवर्षी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.


शंकर महाराज समाधी मठाचा अनधिकृत अन्नछत्र समितीशी संबंध नाही

■ एफडीएच्या तपासणीत स्वयंपाकघर व प्रसाद वाटप व्यवस्थेत कोणतीही त्रुटी आढळली नाही; विश्वस्त मंडळाचे स्पष्टीकरण

पुणे : दैनिक संध्या

श्री सद्गुरू संतवर्य योगीराज शंकर महाराज समाधी मठ, धनकवडी येथील प्रसाद वाटप व्यवस्था नियमितपणे सुरू असून, मठाच्या स्वयंपाकघराची अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) अधिकाऱ्यांकडून तपासणी करण्यात आली आहे. या तपासणीत कोणत्याही प्रकारच्या त्रुटी आढळून आलेल्या नाहीत, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. मिहीर कुलकर्णी आणि सचिव श्री. सतीश कोकाटे यांनी दिली. श्री सद्गुरू संतवर्य योगीराज शंकर महाराज समाधी ट्रस्ट (ए-७९३) यांच्याकडे अन्न व औषध प्रशासनाचा रीतसर अधिकृत परवाना आहे. शंकर महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त एफडीए, पुणे कार्यालयातील अधिकाऱ्यांनी समाधी मठातील अद्ययावत स्वयंपाकघराची तसेच प्रसाद वाटप व्यवस्थेची प्रत्यक्ष तपासणी केली. या तपासणीदरम्यान कोणत्याही त्रुटी निदर्शनास आल्या नसल्याचे ट्रस्टने स्पष्ट केले. दरम्यान, १८ नोव्हेंबर रोजी वर्तमानपत्रे आणि समाजमाध्यमांवर अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईसंदर्भात प्रसिद्ध होत असलेल्या बातम्या या समाधी मठाच्या बाहेरील अनधिकृत शंकर महाराज अन्नछत्र समिती संदर्भातील आहेत. या समितीचा श्री सद्गुरू शंकर महाराज समाधी मठाशी अथवा समाधी ट्रस्टशी कोणताही संबंध नाही, असे विश्वस्त मंडळाने जाहीर निवेदनाद्वारे स्पष्ट केले आहे. संबंधित कारवाईच्या बातम्यांमुळे समाधी ट्रस्टबाबत भाविकांमध्ये कोणताही गैरसमज निर्माण होऊ नये किंवा दिशाभूल होऊ नये, असे आवाहनही विश्वस्त मंडळाने केले आहे. समाधी मठातील प्रसाद वाटपाची व्यवस्था नेहमीप्रमाणे नियमितपणे सुरू असल्याचेही ट्रस्टने स्पष्ट केले आहे. यावेळी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष डॉ. मिहीर कुलकर्णी, सचिव श्री. सतीश कोकाटे, तसेच विश्वस्त श्री. सुरेंद्र वाईकर, डॉ. पी. डी. पाटील, श्री. निलेश मालपाणी आणि श्री. प्रताप भोसले यांनी भाविकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन केले आहे.

शिवरायांच्या चरित्रातील गुण अंगी बाळगा : प.पू. स्वामी गोविंद देव गिरीजी महाराज



पुणे : दैनिक संध्या

सुशासकांची दोन मूर्तिमंत उदाहरणे महाराष्ट्राच्या मातीने जगाला दिली आहेत. ती म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज आणि अहिल्याबाई होळकर. स्वार्थ बाजूला ठेवून देव, देश आणि धर्म यांसाठी स्वतःला कसे समर्पित केले पाहिजे, हे त्यांनी दाखवून दिले. छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनचरित्र इतके महान आहे की, त्यातून केवळ एक चांगला माणूसच नव्हे, तर राष्ट्रपुरुष घडवण्याची क्षमता आहे. बलशाली हिंदुस्थान घडविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्रातील गुण प्रत्येकाने आपल्या अंगी बाळगले पाहिजेत, अशी भावना श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे महासचिव प.पू. स्वामी गोविंद देव गिरीजी महाराज यांनी व्यक्त केली. माहेश्वरी परिवार फाउंडेशन आणि समस्त माहेश्वरी समाज, पुणे यांच्या वतीने प.पू. स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या 'राजर्षी शिवछत्रपती स्फूर्ती गाथा' सोहळ्याचे आयोजन महालक्ष्मी लॉन्स येथे करण्यात आले होते. या सोहळ्याच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. प.पू. स्वामी गोविंद देव गिरीजी महाराज म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारखे महान व्यक्तिमत्त्व महाराष्ट्रात जन्माला आले, हे आपले सौभाग्य आहे. अनेक प्रकारच्या विकारांनी बरबटलेले आपले मन धर्म, राष्ट्र आणि समाजाच्या सेवेसाठी अर्पण करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गुणांचे स्मरण केले पाहिजे. हिंदुस्थानात कोणत्याही प्रकारे स्थिरता निर्माण होऊ नये आणि भारताचे तुकडे होऊन हा देश कमजोर व्हावा, अशी आशा मनात बाळगणाऱ्या अनेक शक्ती अस्तित्वात आहेत. अशा शक्तींसमोर आपण हतबल होऊ नये, यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत निर्माण केलेल्या स्वराज्याची आपल्याला कायम आठवण राहिली पाहिजे. त्यांचे सर्वच गुण आपल्यामध्ये येणे शक्य नाही; परंतु त्यांचे स्मरण जरी केले, तरी त्यातून मिळणाऱ्या प्रेरणेच्या बळावर आपण अखंड हिंदुस्थान बलशाली करू शकतो, असा विश्वास प.पू. स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांनी व्यक्त केला.

विज्ञान साहित्य नांदी संमेलनाचे गुरुवारी (ता. २६) पुण्यात आयोजन

डॉ. नितीन करमाळकर यांची माहिती; शंभराव्या मराठी साहित्य संमेलनानिमित्त मराठी साहित्य-विज्ञानाचा अनोखा संगम

■ पुणे (दै. संध्या)

शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने विज्ञान साहित्य नांदी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. मराठी साहित्य आणि विज्ञानाचा संगम असलेले हे संमेलन महाराष्ट्र साहित्य परिषद, शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे आणि विज्ञान भारती पश्चिम महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले आहे. येत्या गुरुवारी (ता. २६) एस. पी कॉलेज मैदानाजवळील ज्ञानमंडपम येथील भाऊसाहेब चितळे सभागृहात हे संमेलन होणार आहे, अशी माहिती विज्ञान भारती पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. नितीन करमाळकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी विज्ञान भारतीचे सचिव कौस्तुभ साखरे, शिक्षण प्रसारक मंडळीच्या व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष सुधीर काळकर, सचिव रमा कुलकर्णी व पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या विभागप्रमुख डॉ. संजीवनी सोनार, विज्ञानभारतीचे पश्चिम क्षेत्र संघटन मंत्री श्री प्रसाद, संशोधन, इनोव्हेशन आणि इनक्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. प्रशांत दुराफे आदी उपस्थित होते. डॉ. नितीन करमाळकर म्हणाले, "ज्येष्ठ भौतिकशास्त्रज्ञ व विज्ञान लेखक, माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर हे या विज्ञान साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आहेत. वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन मंडळाचे (सीएसआयआर) माजी महासंचालक डॉ. शेखर मांडे प्रमुख पाहुणे असणार आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण, प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक, समर्थ युवा फाउंडेशनचे अध्यक्ष राजेश पांडे, विज्ञान भारतीचे संस्थापक सदस्य डॉ. क. कृ. क्षीरसागर, शिक्षण प्रसारक मंडळींच्या नियामक मंडळाचे उपाध्यक्ष राधेश्याम अग्रवाल आदी उपस्थित राहणार आहेत. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पूर्वतयारीतील हे महत्त्वाचे संमेलन असणार आहे. त्यामुळे मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्या आणि प्रामुख्याने मराठीतून विज्ञानाचा प्रचार प्रसार करु इच्छिणाऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने या संमेलनाला उपस्थित राहावे."



सुधीर काळकर म्हणाले, "या संमेलनाचे संयोजक शिक्षण प्रसारक मंडळीचे संशोधन, इनोव्हेशन व इन्क्युबेशन केंद्र आहे. अशाप्रकारचे संमेलन आयोजित करण्याची संधी मिळणे ही आमच्यासाठी आनंदाची बाब आहे. यानिमित्ताने शिक्षण, विज्ञान आणि साहित्य तिन्ही गोष्टी एकत्र अनुभवता येणार आहेत. येणाऱ्या पिढीला वैज्ञानिक दृष्टीकोन कसा देतानाच नवनिर्मितीला चालना मिळावी, हा संमेलनाचा मुख्य उद्देश आहे. नवोपक्रम, विज्ञान संशोधन व स्टार्टअप संस्कृती विकसित होण्यास या संमेलनामुळे निश्चितच मदत होईल."

कौस्तुभ साखरे म्हणाले, "एकदिवसीय संमेलनात उद्घाटन व समारोप सत्रासोबतच विज्ञानकथा वाचन, विज्ञान साहित्यिक परिसंवाद, शास्त्रज्ञांशी विशेष संवाद व पॉडकास्ट अशी विशेष सत्रे होतील. मराठीतील विज्ञानविषयक साहित्याचा गौरव करणे आणि नवोदित लेखक आणि विज्ञान संवादकांना व्यासपीठ उपलब्ध करुन देणे हा या संमेलनाचा मुख्य उद्देश आहे. यासोबतच संमेलनाच्या निमित्ताने मराठी विज्ञानकथा लेखन आणि अभिवाचन स्पर्धेची घोषणा केली जाणार आहे." रमा कुलकर्णी म्हणाल्या, "विद्यार्थ्यांना विज्ञान आणि मराठी साहित्याची ओळख व्हावी, या उद्देशाने विद्यार्थ्यांसाठी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनीही विज्ञानकथा अभिवाचन स्पर्धेत उत्साहाने सहभाग नोंदवला असून, या स्पर्धेचा निकाल संमेलनाच्या समारोप सत्रात जाहीर करण्यात येणार आहे."

> विज्ञानकथा स्पर्धेचे प्रायोजकत्व पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरींगकडे असल्याचे डॉ. संजीवनी सोनार यांनी सांगितले. पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरींगमध्ये दोन शाखांचा अभ्यासक्रम मराठी विषयातून शिकवला जातो, असे त्या म्हणाल्या.

सलमान खानच्या डान्स आणि स्वॅगचा तडका

■ पुणे (दै. संध्या)

उत्साहाला नवी उंची देत, 'मातृभूमी: मे वॉर रेस्ट इन पीस' या चित्रपटातील नवीन गाणे 'मदिरापान'मध्ये सलमान खान आपल्या खास डान्स स्टाइल आणि सहजसुंदर स्वॅगसह पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. हे गाणे म्हणजे लष्करी जीवनातील धमाल, मस्ती आणि बंधुभावाचे दर्शन घडवणारा एक सुंदर अनुभव आहे. या गाण्यात सलमान खान आपल्या सहकारी जवानांसोबत धमाल डान्स करत आणि आनंद साजरा करताना दिसत आहे. सलमान खान आणि चित्रांगदा सिंह यांची केमिस्ट्री गाण्याच्या दृश्यात्मक आकर्षणात आणखी भर घालते. गाण्याची उत्साही ऊर्जा, कलाकारांचा आकर्षक अंदाज आणि प्रत्येक फ्रेममधील दमदार स्क्रीन प्रेझेन्स प्रेक्षकांसाठी एक पर्वणीच ठरणार आहे. हिमेश रेशमिया यांचे ठेका धरायला लावणारे संगीत, मुदस्सर खान यांचे जबरदस्त नृत्यदिग्दर्शन आणि समीर अंजान यांनी लिहिलेले बोल यांमुळे 'मदिरापान' हे गाणे प्रत्येक पार्टीची रंगत वाढवणारे आणि चार्टबस्टर ठरण्याची क्षमता असलेले गाणे आहे. अपूर्व लाखिया यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या या चित्रपटाची निर्मिती सलमान खान फिल्म्सच्या बॅनरखाली करण्यात आली आहे. चित्रपटाच्या संपूर्ण भारतातील वितरणाची जबाबदारी जिओ स्टुडिओजने सांभाळली आहे, तर आंतरराष्ट्रीय वितरणाची धुरा झी स्टुडिओजकडे आहे. 'मातृभूमी: मे वॉर रेस्ट इन पीस' या चित्रपटात सलमान खान आणि चित्रांगदा सिंह महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये एकत्र झळकणार आहेत.



■ 'मातृभूमी'च्या नव्या 'मदिरापान' गाण्याने चाहत्यांचा उत्साह वाढवला

उरुळी कांचन ग्रामपंचायतीत विधी सेवा शिबिर उत्साहात

■ नागरिकांच्या कायदेशीर मदतीसाठी एमआयटी एडीटी 'स्कूल ऑफ लॉ'च्या विद्यार्थ्यांतर्फे आयोजन

■ पुणे (दै. संध्या)

सर्वसामान्य नागरिकांना कायदेशीर हक्क, अधिकार आणि उपलब्ध न्यायव्यवस्थेची माहिती सहजपणे मिळावी, या उद्देशाने एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ लॉ, उरुळी कांचन ग्रामपंचायत आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (DLSA) यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायत कार्यालयात विधी सेवा (लीगल एड) शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात उपस्थित मान्यवरांनी नागरिकांना विविध कायदेशीर तरतुदी, त्यांचे मूलभूत हक्क, न्याय मिळविण्याच्या प्रक्रिया आणि विधी सेवा प्राधिकरणामार्फत उपलब्ध असलेल्या कायदेशीर सहाय्याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी ग्रामस्थांनी आपले वैयक्तिक तसेच स्थानिक पातळीवरील कायदेशीर प्रश्न मांडले. त्यावर उपस्थित वकिलांनी प्रश्नांचे स्वरूप समजून घेत कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन केले. त्यामुळे नागरिकांना आपल्या कायदेशीर समस्यांबाबत योग्य दिशा मिळण्यास मदत झाली. या कार्यक्रमाला उरुळी कांचनचे सरपंच मिलिंद टी. जगताप, जिल्हा नियोजन समिती सदस्य तथा यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक संतोष आबासाहेब कांचन पाटील, ग्रामविकास अधिकारी पाटील, मोजणी अधिकारी सतिश कुदळे, हवेली तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या व्हीजेएनटी सेलचे अध्यक्ष दिलीप गाडेकर, माजी ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र टिळेकर, स्कूल ऑफ लॉ चे प्रभारी अधिष्ठाता डॉ.गोविंद राजपाल, प्रा. आदित्य केदारी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ लॉमधील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला. एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष व प्र.कुलपती प्रा.डॉ. मंगेश कराड यांच्या प्रेरणेने, तसेच सरपंच मिलिंद जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत कायदेशीर मार्गदर्शन पोहोचविण्याच्या दृष्टीने अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल ग्रामस्थांनी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड आणि सरपंच मिलिंद जगताप यांचे आभार मानले.



'कभी खुशी कभी गम'च्या २५ वर्षांच्या प्रवासानिमित्त रायचंद हाऊसचे दरवाजे चाहत्यांसाठी खुले!

■ पुणे (दै. संध्या)

'कभी खुशी कभी गम' चित्रपटाच्या रौप्यमहोत्सवी वर्धापन दिनानिमित्त एअरबीएनबी प्रतिष्ठित रायचंद हाऊसची पुनर्कल्पना करत आहे आणि 'ॲट होम विथ द रायचंद्स' या कार्यक्रमाद्वारे मुंबईत त्याचे जग प्रत्यक्षात आणणार आहे. हा फक्त एअरबीएनबीवर उपलब्ध असलेला एक खास अनुभव असून त्याचे आयोजन 'के३जी', पू आणि रोहन रायचंद यांचे प्रसिद्ध जग पडद्यावर उतरवणारा चित्रपट निर्माता करण जोहर करत आहे.

ज्या चित्रपटाने आपल्याला भारतीय चित्रपटसृष्टीतील काही अत्यंत प्रिय पात्रे, संवाद आणि फॅशनचे क्षण दिले, त्यातल्या रायचंद हाऊसचे स्वतःचे असे एक वेगळे जग राहिले आहे. इथेच कौटुंबिक नाट्य उलगडले, भव्य एन्ट्री झाल्या, पूने अविस्मरणीय लूक्स दिले आणि रोहनने आपल्या आकर्षणाने मने जिंकली. आता चाहते पडद्यामागे जाऊन ते जग स्वतः अनुभवू शकतात. नॉस्टॅल्जिया, फॅशन, कुटुंब, थोडासा ड्रामा आणि तुमच्यातील बॉलीवूड स्टारला वाव देण्याच्या भरपूर संधींची अपेक्षा करा. चाहत्यांसाठी 'ॲट होम विथ द रायचंद्स' हा एक नवीन अनुभव घेण्याचे आमंत्रण १ ते ६ डिसेंबर दरम्यान उपलब्ध आहे. केवळ १८० जागा उपलब्ध असल्यामुळे बुकिंगसाठी २३ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजता airbnb.com/k3g वर सुरू होतील. या अनुभवाची किंमत शून्य रुपये असेल. मुंबईत येण्या-जाण्याचा प्रवासखर्च पाहुण्यांना स्वतः करावा लागेल.

'कभी खुशी कभी गम'चे चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक करण जोहर म्हणाले: "मी 'कभी खुशी कभी गम'कडे मागे वळून पाहतो, तेव्हा मला एका वास्तवापेक्षा भव्य अशा जगाची निर्मिती करण्याच्या आनंदाची आठवण येते. परंतु, त्यातील भावना अत्यंत ओळखीच्या होत्या. कुटुंब, आपलेपणा, नातेसंबंध आणि घराचा अर्थ यावर आधारित हा एक चित्रपट आहे. एअरबीएनबीच्या माध्यमातून रायचंद हाऊसला जिवंत झालेले पाहणे आणि आपण सर्वांनी इतकी वर्षे कल्पना केलेल्या जगात लोकांना प्रत्यक्षात फिरण्याची संधी देणे, ही खास गोष्ट आहे. चाहते हा अनुभव कधी घेतील याची मी आतुरतेने वाट पाहत आहे." रोहन रायचंदची भूमिका साकारणारे हृतिक रोशन म्हणाले "रोहन हे मी पडद्यावर साकारलेल्या प्रमुख पात्रांपैकी एक होते आणि २५ वर्षांनंतर 'कभी खुशी कभी गम'च्या टीमला पुन्हा भेटल्याने माझ्या अनेक आठवणी ताज्या झाल्या. रायचंद हाऊस पुन्हा साकारलेले पाहणे आणि चाहत्यांना स्वतः त्या आठवणींमध्ये रमून जाण्याची संधी मिळणार आहे आम्हाला हे जग जिवंत करताना जितका आनंद झाला तितकाच आनंद चाहत्यांनाही त्याचा भाग बनताना मिळेल अशी मला आशा आहे." 'पू' ची भूमिका साकारणारी करीना कपूर खान म्हणाल्या की: पू' हे पात्र २५ वर्षांपासून माझ्या आयुष्याचा एक भाग झाले आहे आणि एका संपूर्ण नवीन पिढीसोबत तिचा संवाद आजही कायम आहे याचा मला आनंद वाटतो. आता एअरबीएनबीमुळे चाहत्यांना तिच्या जगात प्रवेश करण्याची, तिच्या आयकॉनिक गोष्टींचा अनुभव घेण्याची संधी मिळत आहे. हा अनुभव म्हणजे 'के३जी' बद्दल लोकांना आवडणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा एक मजेदार उत्सव आहे.



एअरबीएनबी इंडिया आणि आग्नेय आशियाचे राष्ट्रीय प्रमुख अमनप्रीत सिंग बजाज म्हणाले: "मागील २५ वर्षे 'कभी खुशी कभी गम'ने आपल्या पात्रांमधून, संगीतातून आणि कुटुंब व आपलेपणाबद्दलच्या काळातील संदेशातून अनेक पिढ्यांना एकत्र आणले आहे. रायचंद हाऊस हे त्या काल्पनिक घरांपैकी एक आहे, 'ॲट होम विथ द रायचंद्स'च्या माध्यमातून आम्ही चाहत्यांना अनेक वर्षांपासून आवडलेल्या विश्वात प्रवेश करण्याची, संधी देत आहोत. चित्रपटाचा वारसा साजरा करण्याचा आणि त्याची थोडी जादू खऱ्या जगात आणण्याचा हा एक अद्भुत मार्ग आहे."



'सुभाष बी. सणस व्हिंटेज अँड क्लासिक कार म्युझियम'चे उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)

पुणे शहरात 'सुभाष बी. सणस व्हिंटेज अँड क्लासिक कार म्युझियम'च्या उद्घाटनाचा भव्य सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. दुर्मिळ व्हिंटेज आणि क्लासिक गाड्यांचा एक अनोखा संग्रह या संग्रहालयात पाहायला मिळणार असून, यातील अनेक गाड्यांचा भारतातील आणि जगभरातील नामवंत व्यक्तींशी अत्यंत रंजक इतिहास जोडलेला आहे. या संग्रहामध्ये ऐतिहासिक महत्त्व असलेल्या अनेक गाड्यांचा समावेश आहे. यामध्ये भारताच्या माजी दिवंगत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या मालकीची प्रतिष्ठित १९६३ ची 'शेवरलेट इम्पाला' (Chevrolet Impala), हॉलिवूडचे सुपरस्टार अल पचिनो यांच्या मालकीची १९७७ ची 'मर्सिडीज-बेंझ ४५० एसएल' (Mercedes-Benz 450 SL), बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन यांच्याशी संबंधित असलेली 'मर्सिडीज-बेंझ ३५० एसएल' (Mercedes-Benz 350 SL), चिक्की पांडे यांच्या मालकीची १९८३ ची 'मर्सिडीज-बेंझ २८० एसएलसी' (Mercedes-Benz 280 SLC) आणि बॉलिवूड अभिनेते विनोद खन्ना यांच्या मालकीची १९८३ ची 'मर्सिडीज-बेंझ ३०० सीडी' (Mercedes-Benz 300 CD) यांचा समावेश आहे. याशिवाय, प्रसिद्ध 'बॉबी' चित्रपटात डिंपल कपाडिया आणि ऋषी कपूर यांनी वापरलेली सुप्रसिद्ध 'बॉबी' मोटारसायकल यासह ५५ व्हिंटेज कार्स हे या संग्रहालयाचे आणखी एक खास आकर्षण आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री. छगन भुजबळ यांच्या हस्ते आणि पुण्यातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत ३३३ कोरेगाव पार्क, गल्ली क्र. ६, येथील सणस रेसिडेन्सी, येथे या संग्रहालयाचे उद्घाटन झाले. या सोहळ्याला बालाजी राव, डॉ. सायरस पूनावाला, डॉ. शशांक शाह, रूपा आणि सुजय बरावकर, मॅट गोमेन, श्रीकांत आपटे, सौ. अमिताभ गुप्ता आणि सौ. सुनील रामानंद, सौ. नीलम एस. सणस, अर्णव एस., अविनाश साळवी, डॉ. दीपक किरपेकर, डॉ. सत्यजित नाईक यांच्यासह शहरातील इतर प्रतिष्ठित पाहुणे उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्याचे आयोजन 'ऑडली पब' येथे करण्यात आले होते, जिथे सुभाष सणस यांनी स्वतः संकल्पना मांडून विकसित केलेले एक खास रूफटॉप ठिकाण तयार करण्यात आले आहे. त्यानंतर स्नेहभोजनाच्या कार्यक्रमाने या अविस्मरणीय सोहळ्याची सांगता झाली. या अनुभवाला एक वेगळीच उंची देणारे 'रेस रॉक' (Race Rock) हे शेजारील आकर्षण देखील येथे साकारण्यात आले आहे. गाड्यांच्या सुट्या भागांचा (ऑटोमोबाईल पार्ट्स) अत्यंत कल्पकतेने वापर करून याची रचना करण्यात आली असून, त्यातून गाड्यांप्रती असलेली आवड आणि ऑटोमोटिव्ह रिस्टोरेशनच्या कलेचे दर्शन घडते.

थोडक्यात पण महत्वाचे



वर्ल्ड हिंदू काँग्रेसच्या लोगोचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण

मुंबई: दैनिक संध्या

वर्ल्ड हिंदू काँग्रेसच्या आगामी उपक्रमांच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या लोगोचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वर्षा या शासकीय निवासस्थानी करण्यात आले. या वेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासह वर्ल्ड हिंदू काँग्रेस २०२६ चे पदाधिकारी उपस्थित होते. वर्ल्ड हिंदू काँग्रेसच्या माध्यमातून समाजातील विविध क्षेत्रांतील व्यक्ती, संस्था आणि विचारवंतांना एका व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न केला जातो. समाजातील परस्पर संवाद, संघटन, सहकार्य तसेच विविध क्षेत्रांतील योगदानाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने मुंबईत १८, १९ आणि २० डिसेंबर २०२६ या कालावधीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

बंदर प्रकल्प परिसरात स्थानिक युवकांसाठी कौशल्य प्रशिक्षण सुरू करा : राणे

मुंबई : दैनिक संध्या

वाढवण, दिघी आणि कोकणातील प्रमुख बंदर परिसरांतील स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पहिल्या टप्प्यात पाच ते दहा औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि पदविका महाविद्यालये निश्चित करावीत. या संस्थांमध्ये जहाजबांधणी, बंदर संचालन आणि अवजड वाहनचालक यासारखे गरजाधारित अभ्यासक्रम सुरू करावेत, असे निर्देश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी विकास व जहाजबांधणी प्रकल्पांच्या आढाव्यावेळी दिले. 'विकसित महाराष्ट्र 2047'अंतर्गत बंदरे विकास व जहाजबांधणी प्रकल्पांचा आढावा मंत्री राणे यांनी घेतला. यावेळी संबंधित यंत्रणांना त्यांनी सूचना केल्या. या बैठकीला परिवहन व बंदरे विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप बी उपस्थित होते. वाढवण बंदराचा पहिला टप्पा २०३० च्या सुमारास सुरू करण्याचे उद्दिष्ट आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची तयारी करण्यासाठी सहा ते सात महिने, तर संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी एक ते दोन वर्षे लागतात. त्यामुळे बंदर उभारणीबरोबरच प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीचे कामही त्याच वेगाने होणे आवश्यक असल्याचे मंत्री राणे यांनी स्पष्ट केले. जिल्हा आणि तालुकानिहाय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पदविका महाविद्यालये व त्यातील उपलब्ध अभ्यासक्रमांचे मॅपिंग पूर्ण झाले आहे. बंदर आणि जहाजबांधणी उद्योगाला आवश्यक असलेल्या कौशल्यांनुसार अभ्यासक्रम तयार करण्यासाठी बंदर विकास, कौशल्य विकास आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी समन्वय साधावा. उपलब्ध इमारती व पायाभूत सुविधांचा वापर करून आवश्यक प्रशिक्षक, यंत्रसामग्री आणि प्रात्यक्षिक प्रशिक्षणाची व्यवस्था करावी असेही त्यांनी सांगितले. प्रत्येक बंदर प्रकल्पाच्या परिसरातील एक किंवा दोन प्रशिक्षण संस्था जोडाव्यात. बंदर विकासक आणि जहाजबांधणी कंपन्यांनी सामाजिक उत्तरदायित्व निधीतून संबंधित संस्थांतील यंत्रसामग्रीचे आधुनिकीकरण करावे तसेच प्रशिक्षणात सहभाग घ्यावा. यामुळे स्थानिक युवक व मच्छीमार कुटुंबांमध्ये रोजगाराबाबत विश्वास निर्माण होईल आणि प्रकल्पांसाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ स्थानिक पातळीवर उपलब्ध होईल. तीन बंदरांवरील यांत्रिकीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण झाले असून स्मार्ट व्यवस्थापन प्रणालींची प्राथमिक आवृत्तीही कार्यान्वित झाली आहे. 'वन नेशन, वन पोर्ट' उपक्रमांतर्गत राष्ट्रीय पोर्ट कम्युनिटी सिस्टीमची अंमलबजावणी करण्यात आली आहे. संबंधित विभाग आणि ग्राहक प्रणालींच्या एपीआय एकत्रीकरणामुळे बंदर व्यवहार एकसंध पद्धतीने हाताळता येणार आहेत.

पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांमुळे स्वयंरोजगाराच्या मोठ्या संधी

मुंबई : दैनिक संध्या

पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या २१ योजनांचा ऑनलाइन पोर्टलद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या महिन्यात शुभारंभ करण्यात येणार आहे, अशी माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली. पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात पशुसंवर्धन मंत्री मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी पशुसंवर्धन विभागाचे प्रधान सचिव एन. रामस्वामी, सहआयुक्त तसेच विविध अधिकारी उपस्थित होते. पशुसंवर्धन मंत्री मुंडे म्हणाल्या, शेळी-मेंढी गटांचे वाटप, दुधाळ गायी-म्हशींचे संगोपन आणि कुक्कुटपालन यांसह विविध व्यवसायांसाठी या योजनांमधून निधी व शासनाचे अनुदान उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद, फुरसुंगी

फेर निविदा सूचना (२०२६-२७)

(दुसरी वेळ)

फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद मार्फत बांधकाम विभागाकडील विविध कामकाजाकरिता जागांची मोजणी व सर्वे करणे अनुषंगिक कामाकरिता दरपत्रक मागविणेत येत असून, सदर कामाकरीता दिनांक २७/११/२०२६ रोजी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत दरपत्रक फॉर्म नगरपरिषद बांधकाम विभागामध्ये मिळतील. सदर कामाकरीता सविस्तर निविदा सुचना व त्या संबंधित निविदेच्या अटी व शर्ती नगरपरिषद नोटीस बोर्डवर पहावयास मिळतील.

सही /-
मुख्याधिकारी
फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद

शिक्का

पुणे महानगरपालिका

शुद्धीपत्रक

पुणे महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडील निविदा क्र. १६०/२०२६ नमूद केलेली कामाची मुदत ही खालीलप्रमाणे वाचावी.

अ. क्र.	कामाचे नाव	टेंडर क्रमांक	कामाची मुदत
१	पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये जुने मुख्य सभा सभागृह येथे नविन वातानुकूलित यंत्रणा पुरविणे, बसविणे व यशस्वीरीत्या चालू करणे.	PMC/ ELECTRICAL/ 2025/160	३ महिने

वरील बदला व्यतिरिक्त बाकी सर्व मजकूर पूर्वी प्रसिद्ध केल्याप्रमाणे राहील.

सही/-
कार्यकारी अभियंता विद्युत विभाग
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/११८९ दि. १९/११/२०२६

आळंदीत मंदिर परिसरातील दुकानाला भीषण आग



■ आळंदी (दै. संध्या)

श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिराच्या भराव रस्त्यावरील वट्टमवार बंधू यांच्या प्रसाद, पितळी वस्तू व माळा विक्रीच्या दुकानाला बुधवारी (ता. १८) पहाटे साडेतीनच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत दुकानातील साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मात्र, आळंदी नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागाने दाखविलेल्या तत्परतेमुळे आग शेजारील दुकानांमध्ये पसरण्यापासून रोखण्यात यश आले. त्यामुळे समाधी मंदिर परिसरातील संभाव्य मोठी दुर्घटना टळली.

पहाटे ३.४८ वाजता नगरसेवक सुनील घुंडरे व स्थानिक नागरिकांनी आगीची माहिती आळंदी नगरपरिषद अग्निशमन विभागाला दिली. माहिती मिळताच अग्निशमन वाहनासह जवान घटनास्थळी दाखल झाले. दुकानाला मोठ्या प्रमाणात आग लागल्याचे निदर्शनास आल्यानंतर सुरक्षेच्या दृष्टीने प्रथम विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला. त्यानंतर दुकानाचे दोन शटर तोडून अग्निशमन जवानांनी आत प्रवेश केला आणि पाण्याचा मारा सुरू केला.

या कार्यवाहीदरम्यान फायरमन अमित घुंडरे यांनी शटर तोडून दुकानात प्रवेश करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. ही कार्यवाही करताना त्यांना दुखापत झाली. मात्र, प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी कर्तव्याला प्राधान्य देत आग विझविण्याच्या कामात सहभाग घेतला. अग्निशमन जवानांनी सातत्याने पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. त्यानंतर दुकानाची तपासणी करून आगीचे उर्वरित स्रोतही विझविण्यात आले.

समाधी मंदिराच्या अगदी जवळच ही घटना घडल्याने आग पसरल्यास मोठी दुर्घटना होण्याची शक्यता होती. मात्र, अग्निशमन विभागाच्या जवानांनी प्रसंगावधान राखत वेळीच आग नियंत्रणात आणली. प्राथमिक अंदाजानुसार विद्युत शॉर्टसर्किटमुळे आग लागली असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून, आगीचे नेमके कारण तपासणीनंतर स्पष्ट होणार आहे.

मुख्याधिकारी माधव खांडेकर व अग्निशमन विभागप्रमुख विष्णुकुमार शिवशरण यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यवाही करण्यात आली. लीडिंग फायरमन प्रसाद बोराटे, वाहनचालक अजित कुऱ्हाडे, विनायक सोळंकी, फायरमन अमित घुंडरे, सिद्धार्थ गावडे, सुरेश सुलाखे, वनरक्षक व प्राणीमित्र आकाश सूर्यवंशी, महावितरणचे वायरमन अजित घुंडरे, नगरपरिषदेच्या विद्युत विभागाचे दिगंबर कुऱ्हाडे, मनोज गायकवाड तसेच आळंदी पोलिसांनी या कार्यवाहीत सहकार्य केले.

पर्यावरण संरक्षणासाठी जागतिक ज्ञान आणि अनुभवांची देवाणघेवाण आवश्यक : पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे

■ मुंबई(दै. संध्या)



फेब्रुवारी २०२७ मध्ये आयोजित होणारा 'मुंबई क्लायमेट वीक' हा पर्यावरण क्षेत्रातील जागतिक स्तरावरील ज्ञान, अनुभव आणि पर्यावरणपूरक उपायांच्या देवाणघेवाणीसाठी महत्वपूर्ण व्यासपीठ ठरेल. राज्य शासन या उपक्रमाला पूर्ण सहकार्य करणार असून पर्यावरण विभाग यामध्ये ज्ञान भागीदार म्हणून सहभागी होईल, असे पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

मुंबईत २३ ते २६ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत आयोजित होणाऱ्या मुंबई क्लायमेट वीकच्या पूर्वतयारीनिमित्त यशवंतराव चव्हाण केंद्र येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, सचिव डॉ. राजेश गवांदे, प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक शिशिर जोशी यांच्यासह विविध देशांचे महावाणिज्यदूत, उपमहावाणिज्यदूत, कॉन्सुलर कॉर्प्सचे सदस्य आणि प्रोजेक्ट मुंबईचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पर्यावरणाशी संबंधित आव्हाने जागतिक स्वरूपाची आहेत. पृथ्वीचे संरक्षण, महासागर व नद्यांचे प्रदूषण, शहरीकरण, वायुप्रदूषण आणि वाढते तापमान यासारख्या समस्यांवर सर्व देशांनी एकत्रितपणे परवडणारे उपाय शोधण्याची आवश्यकता असल्याचे मंत्री मुंडे यांनी स्पष्ट केले. विविध देशांतील तज्ज्ञांना या उपक्रमात सहभागी करून त्यांच्या अनुभवांवर आधारित संवादात्मक सत्रे आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. वाढते उद्योग, पायाभूत सुविधा आणि नागरिकांच्या बदलत्या जीवनशैलीचा पर्यावरणावर परिणाम होत आहे. त्यामुळे पायाभूत सुविधांची उभारणी आणि विकास प्रक्रियेत पर्यावरणीय शाश्वततेला प्राधान्य देणे आवश्यक आहे. शाश्वत विकासासंदर्भातील कल्पना, तंत्रज्ञान आणि अनुभवांची देवाणघेवाण हा मुंबई क्लायमेट वीकचा महत्त्वाचा भाग असेल, असे मंत्री मुंडे म्हणाल्या. भावी पिढ्यांना शुद्ध हवा, स्वच्छ पाणी आणि सुरक्षित पर्यावरण उपलब्ध करून देणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

कोरेगावमूळ येथे आमदार चषक २०२६ क्रिकेट स्पर्धेला उत्स्फूर्त सुरुवात

■ कोरेगावमूळ (दै. संध्या)

हवेली तालुक्यातील कोरेगावमूळ येथे श्री. रणजित (दादा) कोलते यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या आमदार चषक २०२६ फलपिच गाव वाईज क्रिकेट स्पर्धेला उत्साहात सुरुवात झाली आहे. परिसरातील क्रिकेटप्रेमींसह विविध गावांतील खेळाडूंमध्ये या स्पर्धेबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली असून मैदानावर क्रिकेटचा थरार रंगू लागला आहे.

या स्पर्धेचे आयोजन रणजित (दादा) कोलते, कोरेगावमूळ क्रिकेट क्लब व समस्त ग्रामस्थ यांच्या वतीने करण्यात आले आहे. बुधवार दि. १८ नोव्हेंबर ते रविवार दि. २२ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेतील विजेत्या संघांसाठी आकर्षक रोख पारितोषिकांची घोषणा करण्यात आली आहे. प्रथम क्रमांकासाठी ७१ हजार रुपये शिरुर हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके, द्वितीय क्रमांकासाठी ४१ हजार रुपये जिल्हा परिषद सदस्या सुरेखा रमेश हरगुडे, तृतीय क्रमांकासाठी ३१ हजार रुपये पंचायत समितीचे सदस्य मनोज चौधरी, तर चतुर्थ क्रमांकासाठी २१ हजार रुपये पंचायत समितीचे गटनेते सुदर्शन चौधरी यांचे पारितोषिक ठेवण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याबरोबरच गावागावांतील क्रीडासंस्कृतीला प्रोत्साहन देण्याचा या स्पर्धेमागील उद्देश आहे. आमदार चषकाच्या निमित्ताने कोरेगावमूळ परिसरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले असून पुढील सामन्यांमध्ये कोणता संघ बाजी मारणार, याकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.

ओतूरमध्ये २१ नोव्हेंबरपासून राज्यव्यापी सत्यशोधक अधिवेशन

■ पुणे (दै. संध्या)

महात्मा जोतीराव फुले यांच्या जन्मद्विशताब्दी वर्षानिमित्त पुणे जिल्ह्यातील ओतूर येथे २१ व २२ नोव्हेंबर रोजी राज्यव्यापी सत्यशोधक अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. सत्यशोधक भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील प्रतिष्ठान, सारथ्य फाउंडेशन आणि समस्त ग्रामस्थ ओतूर यांच्या संयुक्त विद्यमाने मार्केट यार्ड येथील सत्यशोधक नगरीत हे अधिवेशन होणार आहे. ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होणार असून खासदार शाहू महाराज अध्यक्षस्थानी असतील.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि सत्यशोधक भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील यांच्या अर्धपुतळ्यांचे अनावरण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रमांक २ येथे होणार आहे. त्यानंतर त्यांच्या प्रतिमांची मिरवणूक काढण्यात येईल. उद्घाटन सोहळ्यात स्थानिक कष्टकरी महिला व पुरुष श्रमिकांचा सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी छगन भुजबळ, बाळासाहेब थोरात, दिलीप वळसे-पाटील, खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पहिल्या दिवशी 'फुले आणि आजच्या शिक्षणाची दशा व दिशा' तसेच 'फुले आणि महिला सक्षमीकरण, समानतेचा नवा संघर्ष' या विषयांवर परिसंवाद होणार आहेत. सायंकाळी 'ज्योतीबाची सावली, सावित्री माऊली' हे महानाट्य सादर केले जाणार आहे. दुसऱ्या दिवशी सत्यशोधकांच्या विद्यमान वंशजांचा विशेष सत्कार, सांस्कृतिक कार्यक्रम आणि 'फुले आणि वर्तमानातील शेतकऱ्यांसमोरील आव्हाने' या विषयावर परिसंवाद होईल.

आदिवासी बांधवांच्या मदतीला धावले नगरसेवक बोऱ्हाडे

■ पिंपरी (दै. संध्या)



राजकीय नेत्यांच्या वाढदिवसानिमित्त हार-तुरे, पुष्पगुच्छ आणि होर्डिंग्जवर होणाऱ्या खर्चाला फाटा देत समाजातील गरजू घटकांसाठी मदतीचा हात पुढे करण्याचा आदर्श भाजपा 'क' प्रभाग अध्यक्ष तथा नगरसेवक निखिल बोराडे यांनी घालून दिला आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येत असलेल्या 'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!' या उपक्रमांतर्गत बोऱ्हाडे यांनी दुर्गम आदिवासी भागातील ४५० गरजू कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंच्या किटच्या माध्यमातून मदत करण्याचा संकल्प केला आहे. त्यापैकी ३९० किटचे वाटप पूर्ण झाले आहे.

भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांचा २७ नोव्हेंबर रोजी वाढदिवस आहे. यानिमित्त वाढदिवसाचा उत्सव केवळ शुभेच्छा, सत्कार आणि प्रसिद्धीपुरता मर्यादित न ठेवता सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी आदिवासी भागातील गरजू कुटुंबांना मदत करण्यासाठी पुढाकार घेतला. टोकावडे, शिरगाव आणि मंदोशी या गावांमध्ये जीवनावश्यक वस्तूंच्या ४५० किटचे वाटप करण्यात आले. दुर्गम भागातील गरजू कुटुंबांपर्यंत मदत पोहोचावी, यासाठी बोऱ्हाडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी नियोजन केले.

विशेष म्हणजे, राजकीय आणि सार्वजनिक जीवनात कार्यरत असताना केवळ आपल्या प्रभागापुरते मर्यादित न राहता दुर्गम आदिवासी भागातील कुटुंबांच्या मदतीसाठी पुढे येण्याची भूमिका बोऱ्हाडे यांनी घेतली आहे. सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून गरजूंच्या दैनंदिन गरजांना प्राधान्य देणारा हा उपक्रम ठरत आहे.आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या या सेवाभावी अभियानात नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी घेतलेला पुढाकार लक्षवेधी ठरला आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने होणारा खर्च समाजोपयोगी कार्यासाठी वळविण्याचा संदेश या उपक्रमातून दिला जात आहे. लोकप्रतिनिधींचे कार्य केवळ विकासकामांपुरते मर्यादित नसून समाजातील वंचित आणि गरजू घटकांच्या पाठीशी उभे राहणेही तितकेच महत्त्वाचे असल्याची भावना यातून अधोरेखित होत आहे.

मुंबई वॉटर मेट्रोसह महत्वाकांक्षी सागरी प्रकल्पांना गती द्यावी

मंत्री नितेश राणे : महाराष्ट्र सागरी मंडळ संचालक मंडळाची ८९ वी बैठक, प्रकल्प रखडवणाऱ्यांना आता मुदतवाढ नाही

■ मुंबई(दै. संध्या)



दीर्घकाळ रखडलेल्या बंदर प्रकल्पांना अखेरची एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा निर्णय महाराष्ट्र सागरी मंडळ संचालक मंडळाने आढावा बैठकीत घेतला. या कालावधीत काम पूर्ण न केल्यास संबंधित प्रकल्प आपोआप रद्द होईल. त्यानंतर मुदतवाढीचा प्रस्ताव मंडळासमोर आणू नये असे मंडळाचे अध्यक्ष आणि मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र सागरी मंडळ संचालक मंडळाची ८९ वी बैठक महाराष्ट्र सागरी मंडळ कार्यालयात मंडळाचे अध्यक्ष मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी त्यांनी या सूचना केल्या. या बैठकीला परिवहन व बंदरे विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी., वित्त विभागाचे उपसचिव सु. सि. पाटील उपस्थित होते.

काही कंपन्यांना २०१८ मध्ये देण्यात आलेल्या प्रकल्पांची मूळ पूर्णता मुदत २०२० पर्यंत होती. कोविड कालावधी आणि पर्यावरणीय मंजुरी प्रक्रियेमुळे या प्रकल्पांना तीन ते चार वेळा मुदतवाढ मिळाली आहे. प्रकल्पांना एसईआयएएची पर्यावरणीय मंजुरी मिळाली असून, खारफुटीविषयक उच्च न्यायालयीन परवानगीची प्रक्रिया प्रलंबित आहे अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिप बी. यांनी दिली.यावर पर्यावरणीय मंजुरी प्रक्रियेचा आधार घेऊन प्रकल्प अनिश्चित काळ प्रलंबित ठेवता येणार नाही. दीर्घ विलंबामुळे प्रकल्पाची किंमत, व्यवहार्यता आणि सार्वजनिक उपयोगिता प्रभावित होत असल्याने मुदतवाढीला निश्चित मर्यादा असणे आवश्यक असल्याचे मंत्री राणे यांनी स्पष्ट केले.

मुंबई वाटर मेट्रो हा अतिशय महत्वाकांक्षी प्रकल्प असून हा प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रक्रियांना गती द्यावी असेही मंत्री राणे यांनी सांगितले.

बैठकीत दिघी येथील मत्स्य उतराई केंद्राच्या निविदा आणि रेवदंडा येथील रो-रो जेट्टीच्या बांधकाम प्रस्तावावरही चर्चा झाली. संबंधित यंत्रणांना सर्व विलंबित प्रकल्पांची संपूर्ण यादी पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश दिले. या यादीमध्ये प्रकल्प मंजुरीचे वर्ष, मूळ कालमर्यादा, आतापर्यंत दिलेल्या मुदतवाढी, विलंबाची कारणे, आवश्यक मंजुऱ्यांची सद्यस्थिती आणि कामाची प्रगती यांचा समावेश करावा.

प्रकरणनिहाय निर्णय घेण्याऐवजी सर्व प्रलंबित प्रकल्पांचा एकत्रित आढावा घेऊन समान निकषांनुसार निर्णय घेतला जाईल असेही मंत्री राणे यांनी स्पष्ट केले. यावेळी महाराष्ट्र सागरी धोरण 2026 चा मसुदा मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला.यावेळी उद्योग विभागाचे कक्ष अधिकारी गणेश कठाळे, अशासकीय सदस्य श्रीहरी देसाई, डॉ.परशराम पाटील, केंद्रीय बंदरे विभागाचे उपसंचालक प्रशांत पाटील, भारतीय नौसेनेचे प्रतिनिधी तन्मोय दास उपस्थित होते.



पिंपरी-चिंचवड आणि परिसर
शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६
दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

थोडक्यात पण महत्वाचे



देहूनगरीत २० ते २२ नोव्हेंबरदरम्यान ९ वी राष्ट्रीय सवाते स्पर्धा; देशभरातील खेळाडूंचा सहभाग

पिंपरी : दैनिक संध्या

अम्युचर सवाते असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या वतीने ९ वी राष्ट्रीय सावते स्पर्धा २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. देहूनगरीत प्रथमच राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असून, शुक्रवार (दि.२०) ते रविवार (दि. २२ नोव्हेंबर २०२६) या कालावधीत ही स्पर्धा पार पडणार आहे. देहू येथील सरस्वती लॉन्स येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. देशभरातील विविध राज्यांतील खेळाडूंना आपले क्रीडाकौशल्य दाखविण्यासाठी या स्पर्धेच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. या स्पर्धेच्या उद्घाटनासाठी आमदार सुनील शेळके, महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार महेश लांडगे यांच्यासह पिंपरी चिंचवड चे महापौर रवीभाऊ लांडगे देहूच्या नगराध्यक्षा स्मिताताई चव्हाण उपनगराध्यक्ष योगेशभाऊ काळोखे तसेच सर्व सन्मानीय नगरसेवक व विविध मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे. क्रीडा क्षेत्रातील अनेक मान्यवरांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभणार आहे. सवाते या क्रीडा प्रकाराला प्रोत्साहन देणे, खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर संधी उपलब्ध करून देणे आणि या खेळाचा प्रसार करणे हा या स्पर्धेच्या आयोजनामागील प्रमुख उद्देश आहे. अम्युचर सावते असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे सचिव सुहास धाईंजे व सर्व आयोजक समितीच्या वतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. क्रीडाप्रेमी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

महिलांसाठी १९ व २० नोव्हेंबरला मोफत आरोग्य शिबिर; आमदार शंकर जगताप यांचा पुढाकार

पिंपरी: दैनिक संध्या

महिलांना स्त्रीरोग तज्ज्ञांकडून तपासणी, सल्ला आणि उपचार मोफत मिळावेत, यासाठी १९ आणि २० नोव्हेंबर २०२६ रोजी जिल्हा रुग्णालय येथे मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिर आयोजित करण्यात आले आहे. दोन्ही दिवशी सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत महिलांना शिबिराचा लाभ घेता येईल. चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांच्या पुढाकारातून चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट, प्रतिभा महिला प्रतिष्ठान आणि जिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. मासिक पाळीतील अनियमितता किंवा अतिरक्तस्राव, पोटदुखी, गर्भधारणेशी संबंधित अडचणी, वंध्यत्व, रजोनिवृत्तीनंतरचे त्रास, कंबरदुखी, मूत्राशयाच्या तक्रारी, स्तनांतील गाठी तसेच गर्भाशय व अंडाशयातील गाठी यांसाठी शिबिरात तज्ज्ञांकडून तपासणी व सल्ला दिला जाणार आहे.शिबिरात रक्त तपासणी, पोट व स्तनांची सोनोग्राफी, स्तनांची तपासणी आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या तपासणीसाठी पॅप स्मिअरची सुविधा असेल. आवश्यकतेनुसार सीटी स्कॅन व एमआरआय तपासणीचीही सुविधा उपलब्ध असेल, असे आयोजकांनी सांगितले. याशिवाय आहार, जीवनशैली, मानसिक आरोग्य आणि रजोनिवृत्तीविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे. शस्त्रक्रियेची गरज असलेल्या पात्र महिलांना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत ओपन व लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रिया मोफत केल्या जातील, अशी माहिती डॉ. देविदास शेलार यांनी दिली. शिबिराला येताना आधार कार्ड, आयुष्मान भारत कार्ड आणि रेशन कार्ड सोबत आणावे. आरोग्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष न करता महिलांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



रहाटणी, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरवमधून वाकड मेट्रो स्टेशनपर्यंत थेट बससेवा सुरू करा

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड शहरातील रहाटणी, पिंपळे सौदागर व पिंपळे गुरव हा परिसर झपाट्याने विकसित होत असून या भागातील लोकसंख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. या परिसरातून दररोज मोठ्या संख्येने नागरिक, विशेषतः आयटी क्षेत्रात काम करणारे कर्मचारी, हिंजवडी आयटी पार्क येथे नोकरी व कामानिमित्त ये-जा करतात. यामध्ये महिला कर्मचाऱ्यांची संख्याही लक्षणीय आहे. सध्या हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो सेवा सुरू झाल्यामुळे या परिसरातील नागरिकांसाठी मेट्रो प्रवास हा एक महत्त्वाचा आणि सोयीस्कर पर्याय उपलब्ध झाला आहे. मात्र, रहाटणी, पिंपळे सौदागर व पिंपळे गुरव या परिसरातून वाकड मेट्रो स्टेशनपर्यंत जाण्यासाठी नियमित व थेट सार्वजनिक बससेवेचा अभाव असल्याने नागरिकांना खासगी वाहने, दुचाकी किंवा इतर पर्यायी वाहतूक व्यवस्थेवर अवलंबून राहावे लागत आहे. परिणामी, दररोज सकाळी व सायंकाळी कार्यालयीन वेळेत रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण वाढत असून नागरिकांचा प्रवासाचा वेळ आणि आर्थिक खर्चही वाढत आहे. विशेषतः महिला कर्मचाऱ्यांना सुरक्षित, नियमित आणि वेळेत प्रवासाची सुविधा उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर रहाटणी – पिंपळे सौदागर – पिंपळे गुरव या परिसरातून वाकड मेट्रो स्टेशनपर्यंत थेट व नियमित PMPML बससेवा सुरू करणे ही काळाची गरज बनली आहे. सदर बससेवा सुरू झाल्यास नागरिकांना मेट्रोपर्यंत सहज पोहोचता येईल, खासगी वाहनांचा वापर कमी होईल, पर्यायाने रस्त्यांवरील वाहतूक कोंडी व प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. तसेच आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांचा प्रवास अधिक सुलभ, किफायतशीर आणि सुरक्षित होईल. त्यामुळे आपण या विषयाकडे केवळ एका बसमार्गाची मागणी म्हणून न पाहता, वाढत्या शहरी लोकसंख्येची आणि सार्वजनिक वाहतुकीच्या आवश्यकतेची गंभीर बाब म्हणून पाहावे. तरी आपण संबंधित अधिकाऱ्यांमार्फत तातडीने या मार्गाची पाहणी व प्रवासी संख्येचे सर्वेक्षण करून रहाटणी, पिंपळे सौदागर व पिंपळे गुरव येथून वाकड मेट्रो स्टेशनपर्यंत नियमित बससेवा सुरू करण्याबाबत त्वरित सकारात्मक निर्णय घ्यावा. तसेच कार्यालयीन वेळेतील प्रवाशांची संख्या लक्षात घेऊन पुरेशा वारंवारतेने बसफेऱ्यांचे नियोजन करावे, ही आग्रही मागणी आहे.

वेस्ट टू एनर्जी प्रकल्प साडेपाच महिन्यांपासून बंद

चिमणी उभारणीचे काम रखडले; महापालिकेचे साडेसहा कोटींचे नुकसान, ठेकेदाराला २४ लाखांचा दंड



■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी कचरा डेपोतील सुक्या कचऱ्यापासून वीजनिर्मितीचा (वेस्ट टू एनर्जी) प्रकल्पातील धुराड्याची चिमणी पडल्यामुळे साडेपाच महिन्यांपासून बंद असलेला प्रकल्प सुरू करण्यात ठेकेदार व पर्यावरण विभागाला अद्याप यश आले नाही. चिमणी उभारण्यास विलंब होत असल्याने डेपोत कचऱ्याचे डोंगर वाढत आहेत. प्रकल्प बंद असल्याने तब्बल एक लाख १५ हजार ५०० टन सुक्या कचऱ्यावर प्रक्रियाच झालेली नाही. मुदतीमध्ये काम पूर्ण न करणाऱ्या ठेकेदाराला एक ऑक्टोबरपासून प्रतिदिन ५० हजार रुपयांचा दंड लावला जात आहे. मोशी येथील ८१ एकर जागेतील डेपोत संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहराचा मागील ४० वर्षांपासून कचरा टाकला जात आहे. शहरात दररोज सुमारे एक हजार ५०० टन कचरा डेपोत आणून टाकला जात आहे. येथे ७०० टन कचऱ्यापासून वीज निर्मितीचा प्रकल्प ॲन्टोनी लारा रिन्युएबल एनर्जी प्रा. लि. या ठेकेदारामार्फत जुलै २०२३ पासून सुरू आहे. त्या माध्यमातून दररोज ७०० टन सुक्या कचऱ्यांची विल्हेवाट लागत आहे. तसेच, बायोमायनिंगसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करूनही अद्याप तेथील कचऱ्याचे डोंगर कमी झालेले नाहीत. दररोज सातशे टन सुका कचरा जाळून त्यापासून १४ मेगा वॅट वीज तयार केली जात आहे. पाच जून २०२६ रोजी प्रकल्पातील धुराड्याची चिमणी पडल्याने वेस्ट टू एनर्जी प्रकल्प बंद झाला आहे. त्यानंतर ८ जुलैला प्रकल्पातील अनधिकृत प्रशासकीय इमारत कोसळून ९ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला होता, तर १२ कर्मचारी जखमी झाले होते. तेव्हापासून शहरात कचऱ्याची समस्या अधिक गंभीर झाली आहे. डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्प लवकरात लवकर सुरू करण्याचे आदेश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबंधित ठेकेदाराला दिले होते.

ठेकेदाराने ३० सप्टेंबरपर्यंत चिमणीचे काम पूर्ण करून एक ऑक्टोबरपासून प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात येईल, अशी ग्वाही दिली दिली होती. मात्र, ठेकेदार ३० सप्टेंबरपर्यंत चिमणीचे कामकाज पूर्ण करू शकला नाही. त्यामुळे आयुक्तांनी ठेकेदाराला एक ऑक्टोबरपासून प्रतिदिन ५० हजार रुपयांचा दंड आकारण्यास सुरुवात केली. त्यानंतर हा प्रकल्प १५ नोव्हेंबरपर्यंत सुरू करण्याचे आदेशही प्रशासनाने संबंधित ठेकेदाराला दिले होते, परंतु या मुदतीमध्येही चिमणी उभारण्याचे काम पूर्ण होऊ शकले नाही. सोळा नोव्हेंबरपर्यंत ६० मीटर उंचीपैकी ५४ मीटर चिमणी उभारण्याचे काम पूर्ण झाल्याचे पर्यावरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, दररोज सातशे टन कचऱ्याची विल्हेवाट लावली जात नसल्याने डेपोत कचऱ्याचे नवीन डोंगर तयार झाले आहेत. कचऱ्याचे डोंगर कमी होण्याऐवजी वाढत असल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. वेस्ट टू एनर्जी प्रकल्प सुरू असताना दररोज ७०० टन कचरा जाळला जात होता. त्यातून १४ मेगा वॅट वीजनिर्मिती केली जात होती. मात्र, गेल्या साडेपाच महिन्यांपासून प्रकल्प बंद असल्याने तब्बल एक लाख १५ हजार ५०० टन सुका कचऱ्यावर प्रक्रिया झालेली नाही. त्यामुळे क्षमता संपली असताना मोशी कचरा डेपोत कचऱ्याचे सात ते आठ मजली इमारती एवढे नवीन डोंगर तयार झाले आहेत. त्यामुळे आजूबाजूच्या रहिवाशांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे.

दिवाळीतील सुटीमुळे कामास विलंब

वेस्ट टू एनर्जी प्रकल्पातील चिमणी सुरू करण्यासाठी संबंधित ठेकेदाराला १५ नोव्हेंबरपर्यंतची दुसरी मुदत दिली होती. मात्र, दिवाळीच्या सुट्यांमुळे कामाला विलंब झाला. चिमणीचे ६० मीटरपैकी ५४ मीटर काम पूर्ण झाले आहे. लवकरात लवकर काम पूर्ण करून चाचणी घेऊन प्रकल्प सुरू केला जाईल, असे महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाचे सहशहर अभियंता विनय ओहोळ यांनी सांगितले.

महापालिकेचे साडेसहा कोटींहून अधिकचे नुकसान

साडेपाच महिन्यांपासून वेस्ट टू एनर्जी प्रकल्प बंद असल्याने वीज निर्मिती ठप्प आहे. प्रकल्पात निर्माण होणारी वीज महापालिकेकडून महावितरणला देण्यात येत होती. त्यातून सवलतीमध्ये मिळणाऱ्या विजेचा रावेत येथील अशुद्ध पाणी उपसा केंद्र आणि मैलाशुध्दीकरण केंद्राला वापर केला जात होता. वेस्ट टू एनर्जी प्रकल्पच बंद असल्याने महापालिकेचे साडेपाच महिन्यांत सुमारे साडेसहा कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. महापालिकेला अधिकच्या दराने वीजबिल भरावे लागत आहे, अशी माहिती विद्युत विभागाने दिली आहे. तसेच, दररोज ७०० टन कचरा न जाळल्याने कचऱ्याचा भार वाढला आहे. वेस्ट टू एनर्जीच्या ठेकेदाराला १ ऑक्टोबरपासून १७ नोव्हेंबरपर्यंत दिवसाला ५० हजार रुपयांनुसार ४८ दिवसांत दंडाची रक्कम २४ लाख रूपये झाली आहे. प्रकल्प बंद असल्याने महापालिकेचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.

पार्किंग पॉलिसीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'अ' क्षेत्रीय कार्यालयात बारणे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न

■ पिंपरी (दै. संध्या)



शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी आणि नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आज 'अ' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत एक महत्त्वाची संयुक्त बैठक पार पडली. स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकित उपमहापौर शर्मिला बाबर, क्रीडा सभापती प्रमोद कुटे, नगरसेवक उत्तम केंदळे, राजू मिसाळ, बापू घोलप, अमित गावडे, सुजाता कारंडे, तसेच महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी, दळणवळण विभाग, बीआरटीएस विभाग, वाहतूक विभाग आणि इतर संबंधित विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहरात पार्किंग पॉलिसीच्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. शहरातील वाहतूक व्यवस्था, पार्किंगच्या निर्माण झालेल्या समस्या, रस्त्यांवरील अडचणी तसेच नागरिकांना दररोज भेडसावणाऱ्या विविध नागरी समस्यांचा सखोल आढावा घेण्यात आला. या वाहतुकीच्या मुद्द्यासोबतच पाणीपुरवठा, वीज, आरोग्य, स्वच्छता आणि इतर सर्व महत्त्वाच्या विभागांच्या कामकाजासंदर्भातही संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. नागरिकांकडून सातत्याने मांडण्यात येणाऱ्या समस्या, प्रलंबित कामे आणि आवश्यक उपाययोजनांबाबत प्रत्येक विभागाला योग्य त्या कठोर सूचना देण्यात आल्या.

पिंपरी-चिंचवडकरांना मार्चमध्ये मिळणार १६७ एमएलडी अतिरिक्त पाणी

■ पिंपरी (दै. संध्या)



मागील सात वर्षांपासून एकदिवसाआड पाणीपुरवठा त्यात सध्या दहा टक्के पाणी कपातीला पिंपरी-चिंचवड शहरवासीयांना सामोरे जावे लागत आहे. नागरिकांना भामा आसखेड धरणातून नवीन वर्षात मार्च महिन्यात 167 एमएलडी पाणी मिळणार आहे. या योजनेचे काम जानेवारी 2027 अखेर पूर्ण करण्याचे नियोजन महापालिका प्रशासनाने केले आहे. थेट धरणापासून भूमिगत जलवाहिनीद्वारे मिळणाऱ्या स्वच्छ अतिरिक्त पाण्यामुळे शहरातील पाणीपुरवठ्यावरील ताण कमी होऊन नागरिकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून, त्यानुसार पाण्याची मागणीही वाढत आहे. मात्र, उपलब्ध पाणीसाठा आणि वाढती मागणी यांचा ताळमेळ घालताना महापालिका प्रशासनाला कसरत करावी लागत आहे. शहरातील अनेक भागांमध्ये नागरिकांना अपुऱ्या व अनियमित पाणीपुरवठ्याला सामोरे जावे लागत आहे.

देहूत इंद्रायणी घाटाची पडझड; भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर!

■ देहूगाव (दै. संध्या)



श्रीक्षेत्र देहूगाव येथील मुख्य मंदिर ते पवन धर्मशाळा परिसरादरम्यान इंद्रायणी नदीच्या तीरावर बांधण्यात आलेल्या घाटाचा काही भाग कोसळला असून, अद्याप त्याची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. घाटाचे पडलेले दगड आणि मातीचा ढिगारा तसाच पडून असल्याने परिसराला विद्रूप स्वरूप आले आहे. त्याचबरोबर स्नानासाठी व दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी-भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

आळंदी-देहू विकास परिसर समितीच्या वतीने लोकवर्गणीतून २००२ साली इंद्रायणी नदीच्या तीरावर या घाटाची उभारणी करण्यात आली होती. विश्वनाथ कराड यांच्या पुढाकारातून घडीव दगडांचा वापर करून बांधण्यात आलेल्या या घाटामुळे मुख्य मंदिर परिसराच्या सौंदर्यात भर पडली होती.

पिंपरी न्यायालयातील ६७ कर्मचारी बेमुदत संपावर

■ पिंपरी (दै. संध्या)



वेतनवाढीचा प्रस्ताव रखडल्याने राज्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी मंगळवार (दि. १७) पासून बेमुदत संप पुकारला आहे. त्यानुसार नेहरूनगर, पिंपरी येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील वर्ग तीन व वर्ग चारच्या ६७ कर्मचाऱ्यांनी वेतनवाढीच्या मागणीला पाठिंबा दर्शवत आंदोलनात सहभाग घेतला आहे. कर्मचाऱ्यांच्या काम बंद आंदोलनामुळे पिंपरी न्यायालयातील कामाकाजावर परिणाम झाला आहे.

संपामध्ये सहाय्यक अधीक्षक, स्टेनो, वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक आणि शिपाई या पदांवरील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. गेल्या २१ महिन्यांपासून वेतनवाढीचा निर्णय प्रलंबित असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आहे. या मागणीसंदर्भात उच्च न्यायालयाच्या स्तरावरून जानेवारी २०२५ मध्ये शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असल्याचे संपात सहभागी असलेल्या कर्मचाऱ्यांनी सांगितले. आंदोलनाबाबत तीन महिन्यांपूर्वीच शासनाला पूर्वसूचना देण्यात आली होती. त्यानंतर दोन महिन्यांपूर्वी कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून शांततेच्या मार्गाने आंदोलन केले. मात्र, या आंदोलनानंतरही वेतनवाढीच्या प्रश्नावर कोणताही ठोस निर्णय झाला नाही. त्यामुळे अखेर कर्मचाऱ्यांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे.

दुष्काळग्रस्त पशुधनासाठी महापालिकेचा पुढाकार; ४०० एकरांवर चारा लागवड करणार

■ पिंपरी(दै. संध्या)



महाराष्ट्र राज्यातील अनेक भागांत दुष्काळ निर्माण झाल्याने पाण्यासह जनावरांसाठी चाऱ्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीसाठी पिंपरी-चिंचवड महापालिका पिंपरी येथील मिलिटरी डेअरी फार्मच्या सुमारे चारशे एकर पडीक जागेत चारा लागवड करणार आहे. तो चारा दुष्काळग्रस्त भागांना पुरवण्यात येणार आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी व पशुधनासाठी मदतीचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे. त्या आवाहनाला प्रतिसाद देत महापालिकेने हा उपक्रम हाती घेतला आहे. शहरात पिंपरी येथे संरक्षण विभागाची मिलिटरी डेअरी फार्मची सुमारे ४०० एकर पडीक जमीन आहे. संरक्षण विभागाने तेथील डेअरी काही वर्षांपूर्वी बंद केली आहे. गेल्या वर्षी तेथे झालेल्या धार्मिक सत्संग कार्यक्रमासाठी तो भाग स्वच्छ करून सपाटीकरण करण्यात आले होते. त्या वेळी डेअरी फार्मची इतकी मोठी जागा शहराच्या मध्यभागात असल्याचे शहरवासीयांना समजले. ती जागा चारा लागवडीसाठी महापालिकेस तात्पुरत्या कालावधीसाठी देण्याची मागणी संरक्षण विभागाकडे करण्यात आली आहे.

चारा लागवड पूर्ण झाल्यानंतर संरक्षण विभागास ती जमीन पूर्ववत करून देण्यात येणार आहे. संरक्षण विभागाकडून एनओसी मिळाल्यानंतर जमिनीची मशागत करून लागवडीचे काम सुरू करण्यात येणार आहे. या जमिनीत मका व इतर चारा पिकांची लागवड केली जाणार आहे. त्यासाठी महापालिका आपले मनुष्यबळ लावणार आहे.

जानेवारी महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात पेरणी करण्याचे नियोजन असून, साधारण दोन ते तीन महिन्यांत म्हणजेच मार्च किंवा एप्रिलपर्यंत चारा उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. तयार होणारा चारा राज्यात सर्वाधिक टंचाई असलेल्या भागांत पाठविण्याचे नियोजन आहे. शासनाच्या मार्गदर्शनानुसार चारा उपलब्ध करून देण्यास मदत होणार आहे, असे महापालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



जिओ टॉवरच्या बॅटरीवर चोरट्यांचा डल्ला

जेजुरी : दैनिक संध्या

जेजुरी परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ सुरूच असून, आता चोरट्यांनी थेट मोबाईल टॉवरलाच लक्ष्य केल्याची घटना समोर आली आहे. पुरंदर तालुक्यातील आंबळे येथील मोबाईल टॉवरच्या बॅकअप सिस्टीमला जोडलेल्या तब्बल चार बॅटरी बँक अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्या आहेत. या चोरीत अंदाजे एक लाख रुपयांचा ऐवज लंपास झाला आहे. जेजुरी येथील वेताळनगर परिसरात राहणारे अरबाज अल्ताफ अत्तार, वय २० वर्षे, हे टेक्निशियन म्हणून काम करतात. १७ नोव्हेंबर रोजी पहाटे सव्वातीन वाजण्याच्या सुमारास आंबळे येथील मोबाईल टॉवरच्या बॅकअप सिस्टीमला जोडलेल्या लिओन कंपनीच्या ४८ व्होल्ट क्षमतेच्या चार बॅटरी बँक अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्या.या चोरीच्या घटने बाबत आतार यांनी जेजुरी पोलिस स्टेशन मध्ये तक्रार दाखल केली आहे. जेजुरी शहर आणि परिसरात सतत घरफोडी, सोन्याचे दागिने, दुचाकी आणि मोबाईल चोरीच्या घटना घडत आहेत . आता थेट मोबाईल टॉवरच्या बॅटरी चोरीला गेल्याने चोरट्यांचे धाडस वाढले आहे.

ऊस तोडणी रखडल्याने शेतकरी हवालदिल

चाकण : दैनिक संध्या

ऊस तोडणी यंदा वेळेवर सुरू न झाल्यामुळे आणि वाहतूक यंत्रणा कोलमडल्यामुळे शेतकरी वर्ग मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. कारखान्यांकडून तोडणीबाबत दिरंगाई होत असल्यामुळे तयार झालेला ऊस शेतातच सुकण्याची भीती निर्माण झाल्याने ऊस उत्पादक शेतकरी हवालदिल झाला आहे. साखर कारखाने आणि प्रशासनाने यावर तात्काळ तोडगा काढून ऊस तोडणी तातडीने करावी, अशी मागणी संतप्त शेतकऱ्यांनी केली आहे. चाकण व परिसरातील शेतकऱ्यांनी अहोरात्र मेहनत करून ऊसाचे पीक घेतले आहे. मात्र, सध्या ऊस तोडणी यंत्रणेतील नियोजनाचा अभाव आणि मजुरांच्या उपलब्धतेतील अडचणींमुळे वाहतूक पूर्णपणे खोळंबली आहे. याचा फटका थेट बळीराजाला बसत असून, शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडला आहे. कारखान्यांनी तात्काळ आपली तोडणी यंत्रणा गतिमान करून शेतकऱ्यांचा ऊस गाळपासाठी नेण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी चाकण नगर परिषदेचे स्वच्छता व आरोग्य समितीचे सभापती तथा नगरसेवक मंगेश कांडगे, शशिकांत जाधव, स्मिता जाधव, साहेबराव कड आदींनी केली आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या या ज्वलंत प्रश्नांवर साखर कारखान्यांच्या प्रशासनाने कोणतीही कसूर न ठेवता त्वरित पावले उचलली नाहीत, तर शेतकऱ्यांना सोबत घेऊन तीव्र आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल, असा इशारा नगरसेवक मंगेश कांडगे, नगरसेविका सुवर्णा राक्षे यांनी दिला आहे. चाकण परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण असून, लवकरात लवकर ऊस तोडणी सुरू करण्याची जोरदार मागणी होत आहे. "पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात अद्याप पर्यंत साखर कारखाना उभारण्यात आलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा काढलेला ऊस इतर तालुक्यातील कारखान्यांमध्ये न्यावा लागत असल्याने मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. कारखाना उभारण्यासाठी वरिष्ठांनी लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे." " ऊस लागवडी पासून ऊस कारखान्यात नेईपर्यंत मोठा खर्च करावा लागत आहे. त्यातच ऊस तोडणी रखडल्याने ऊस लागवडीचा खर्च निघेल का नाही, याबद्दल मोठी धास्ती वाटते. कारखानदारांनी याकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन ऊस वेळेत तोडण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे, असे मंगेशभाऊ कांडगे, नगरसेवक, चाकण यांनी सांगितले.





विद्यार्थ्यांच्या कल्पकतेतून साकारले ऐतिहासिक किल्ल्यांचे वैभव

नारायणगाव: दैनिक संध्या

आळे येथील ज्ञानमंदिर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी गड-किल्ले बांधणी व सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पद्मदुर्ग किल्ल्याची देखणी प्रतिकृती तयार करणाऱ्या श्रीराज निलेश डोंगरे याने प्रथम क्रमांक मिळविला. दिवाळीच्या सुट्टीत विद्यार्थ्यांनी वेळेचा सदुपयोग करावा, त्यांच्यातील कल्पकता आणि सर्जनशीलता विकसित व्हावी, तसेच महाराष्ट्रातील ऐतिहासिक गड-किल्ल्यांची माहिती नव्या पिढीला व्हावी, या हेतूने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी झालेल्या या स्पर्धेत २१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी रायगड, लोहगड, मुरुड-जंजिरा, सिंधुदुर्ग, मल्हारगड, प्रतापगड, पद्मदुर्ग आणि पन्हाळा अशा विविध ऐतिहासिक किल्ल्यांच्या प्रतिकृती साकारून आपली कलात्मकता दाखवून दिली. या उपक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप भवारी यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या या कल्पक उपक्रमाचे संस्थेचे अजय कुऱ्हाडे, भाऊ कुऱ्हाडे,अरुण हुलवळे, जीवन शिंदे, सौरभ डोके, किशोर कुऱ्हाडे,अर्जुन पाडेकर, दिनेश सहाने,बबन सहाने,सम्राट कुऱ्हाडे ,संपत गुंजाळ, कैलास शेळके, बाबुराव कुऱ्हाडे,देविदास पाडेकर, उल्हास सहाने आणि प्रदीप गुंजाळ यांनी कौतुक केले.



न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे आंदोलन दुसऱ्या दिवशीही सुरूच

■ राजगुरुनगर (दै. संध्या)



शासनाचा अध्यादेश हातात पडत नाही, तोपर्यंत आंदोलनातून माघार घेणार नाही, असा आक्रमक पवित्रा घेत राजगुरुनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी सलग दुसऱ्या दिवशीही काम बंद आंदोलन सुरू ठेवले. राज्यभरातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या बेमुदत संपाला राजगुरुनगर न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी सक्रिय पाठिंबा दिला आहे.

उच्च न्यायालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील दुय्यम न्यायालयांमधील कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा व आर्थिक लाभांचा प्रस्ताव गेल्या २२ महिन्यांपासून राज्य शासनाकडे प्रलंबित आहे. या प्रस्तावाला मंजुरी मिळावी, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाखाली राज्यव्यापी बेमुदत संप पुकारण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघांतर्गत लिपिक संघटना (गट-क), बेलीफ संघटना, लघुलेखक संघटना आणि शिपाई संघटनांच्या वतीने यापूर्वी शासनाला आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. मात्र, मागण्यांबाबत शासनाकडून ठोस निर्णय होत नसल्याने अखेर कर्मचाऱ्यांनी संपाचे हत्यार उपसले आहे.

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतनश्रेणीच्या धर्तीवर दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही समान कामासाठी समान वेतन व आर्थिक लाभ मिळावेत, ही आंदोलनाची प्रमुख मागणी आहे.

यासंदर्भातील प्रस्ताव गेल्या २२ महिन्यांपासून शासन दरबारी प्रलंबित असल्याने तो तातडीने मंजूर करून शासनाने अध्यादेश काढावा, अशी मागणी कर्मचाऱ्यांनी केली आहे.

राजगुरुनगर न्यायालयातील या आंदोलनात लिपिक संघटनेचे उपाध्यक्ष शैलेश गलधर, बेलीफ संघटनेचे उपाध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे, लघुलेखक संघटनेचे अजय शिवापूरकर व स्वाती खिस्ती, शिपाई संघटनेचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर तुपे, निवृत्त कर्मचारी ॲड. राजेंद्र घुमटकर, अधीक्षक स्वाती मगर, मनिषा नातू, दत्ता पवार, सचिन क्षीरसागर, विनोद भालेराव, गट-क बेलीफ संघटनेचे अभिलेश बोरसे यांच्यासह विविध पदांवरील एकूण ८० कर्मचारी सहभागी झाले होते. उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही समान कामासाठी समान वेतन मिळावे आणि प्रलंबित आर्थिक लाभांचा प्रस्ताव तातडीने मंजूर करावा, अशी ठाम भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे.

समान काम, समान जबाबदारी; मग वेतनात दुजाभाव का?

दुय्यम न्यायालयांतील कर्मचारीही उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच जबाबदारीने आणि समान स्वरूपाचे काम करतात. मात्र, वेतन व आर्थिक लाभांच्या बाबतीत दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांवर अन्याय होत आहे. समान कामासाठी समान वेतन या तत्त्वानुसार उच्च न्यायालयाच्या सुधारित वेतनश्रेणीप्रमाणे आम्हालाही आर्थिक लाभ मिळणे आवश्यक आहे. यासंदर्भातील प्रस्ताव गेल्या २२ महिन्यांपासून शासनाकडे प्रलंबित आहे. शासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन प्रस्ताव तातडीने मंजूर करावा. अन्यथा न्याय्य हक्क मिळेपर्यंत आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल.

— शैलेश गलधर, अध्यक्ष, लिपिक संघटना, राजगुरुनगर न्यायालय

संपामुळे वकील आणि पक्षकारांना त्रास, मात्र पर्याय नाही!

न्यायालयाने मागणी मान्य करूनही शासनाकडून निर्णय घेण्यास विलंब होत आहे, ही मोठी शोकांतिका आहे. संपामुळे वकील, पक्षकार आणि न्यायालयीन कामकाजावर परिणाम होत असल्याची आम्हालाही खंत आहे. मात्र, आमच्यासमोर दुसरा पर्याय नाही. एकाच व्यवस्थेत समान स्वरूपाचे काम करताना कर्मचाऱ्यांमध्ये दुजाभाव का केला जातो, असा आमचा सवाल आहे.

- स्वाती खिस्ती, लघुलेखक संघटना

कर्मचाऱ्यांच्या हिताचा निर्णय तातडीने घ्या!

आमचा संप कायदेशीर मार्गाने सुरू आहे. उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयांतील सर्व कर्मचारी वर्गाला न्याय मिळावा, ही आमची भूमिका आहे. संप अधिक काळ लांबू नये, यासाठी शासनाने कर्मचाऱ्यांच्या हिताकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावा, एवढीच आमची मागणी आहे.

- बाळासाहेब शिंगाडे, उपाध्यक्ष, बेलीफ संघटना

प्रेम संबंधातील वादातून तरुणावर लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला

■ चाकण (दै. संध्या)

प्रेमसंबंधातील टोकाच्या वादातून तरुणावर लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला केल्याची विचित्र घटना चाकण नजीक असलेल्या मेदनकरवाडी (ता. खेड) येथे घडली. या प्रकरणातील आरोपी आसाम राज्यात पळून जाण्याच्या तयारीत असतानाच चाकण दक्षिण पोलिसांनी त्याला पुणे रेल्वे स्थानकातून अवघ्या आठ तासांत जेरबंद केले.

येथील पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी (दि.१६) पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास मेदनकरवाडी येथील एका पत्र्याच्या खोलीमध्ये एक तरुण रक्ताच्या थारोळ्यात बेशुद्ध अवस्थेत पडल्याची माहिती चाकण पोलिसांना मिळाली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन चाकण दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जखमी तरुणाला तातडीने उपचारासाठी दाखल करण्यात आले.

घटनास्थळी मिळालेल्या माहितीच्या आधारे जखमी तरुणाचे नाव अमिनुल इस्लाम असल्याचे समोर आले. तसेच त्याच्यावर हल्ला करणाऱ्या संशयिताचे नाव शाहिदुल इस्लाम शेख असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांना मिळाली. या घटनेच्या तपासादरम्यान इमामुल हक अब्दुल बारक (वय २३, मूळ रा. आसाम) याच्याकडूनही महत्त्वाची माहिती मिळाली. घटनेनंतर आरोपी पसार झाल्याने पोलिसांनी घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे त्याचा माग काढण्यास सुरुवात केली. आरोपी मोबाइल बंद करून पुणे शहराच्या दिशेने प्रवास करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. तसेच तो परराज्यात म्हणजेच आसाम येथे पळून जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवत पुणे रेल्वे स्थानकावर सापळा रचला. अखेर आरोपी आसामला रवाना होण्यापूर्वीच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. घटनेपासून अवघ्या आठ तासांच्या आत आरोपीला जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले. दरम्यान, आरोपीकडे केलेल्या चौकशीत जखमी अमिनुल इस्लाम याच्याशी त्याचे प्रेमसंबंधांवरून वाद असल्याचे समोर आले. याच वादातून त्याच्यावर लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला केल्याची माहिती तपासात पुढे आली.

राज्य कार्यकारिणीवर भोंगळे यांची निवड

■ पुरंदर (दै. संध्या)

पत्रकारांची मातृसंस्था आणि सर्वात जुनी संस्था असलेल्या अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या राज्य कार्यकारिणीचे सदस्य म्हणून पुरंदर तालुका मराठी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष आणि दैनिक सकाळचे ज्येष्ठ पत्रकार श्री. दत्तात्रय भोंगळे यांची निवड करण्यात आली आहे.



आचार्य प्र. के.अत्रे, पा. वा. गाडगीळ, अनंत भालेराव यांसारख्या दिग्गज पत्रकारांनी ज्या संस्थेचे अध्यक्षपद भूषवले, त्याच गौरवशाली परंपरेच्या परिषदेत आता पुरंदरच्या भोंगळे यांना स्थान मिळाले आहे. विद्यमान अध्यक्ष शिवराज काटकर यांच्या नेतृत्वाखालील राज्य कार्यकारिणीत ही निवड झाली आहे.

पुरंदर तालुक्यात पत्रकार संघटनेची मुहूर्तमेढ रोवून, विखुरलेल्या ग्रामीण पत्रकारांना एका छताखाली आणण्याचे ऐतिहासिक काम श्री. भोंगळे यांनी केले. गेली अनेक वर्षे त्यांनी पुरंदर तालुक्यातील शेती, पाणी, रस्ते, शिक्षण आणि सर्वसामान्यांचे प्रश्न सातत्याने, निर्भीडपणे मांडले आहेत. निर्भीड लेखणी, तळमळीने काम करण्याची वृत्ती आणि पत्रकारांसाठी झटणारा नेता, अशीच त्यांची ओळख आहे. याच कार्याची दखल घेऊन राज्य पातळीवर त्यांची ही निवड झाली आहे. या निवडीमुळे पुरंदर तालुक्यातील पत्रकारांमध्ये आनंदाचे वातावरण असून, जेजुरी, सासवड, निरा, गराडे, वाल्हे, वीर, माळशिरस, पुरंदर परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सासवडच्या वाघिरे महाविद्यालयाचा डंकाप

■ सासवड (दै. संध्या)

शरीरसौष्ठवाच्या आखाड्यात सासवडच्या वाघिरे महाविद्यालयाने पुन्हा एकदा आपली ताकद दाखवून दिली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीच्या आंतरमहाविद्यालयीन शरीरसौष्ठव स्पर्धेत ३ सुवर्ण, १ रौप्य आणि १ कांस्य अशी एकूण ५ पदके पटकावत वाघिरे महाविद्यालयाने सांघिक विजेतेपदावर आपले नाव कोरले. याच स्पर्धेत राहुल शेटे याने 'आंतरमहाविद्यालयीन जिल्हा श्री २०२६'चा मानाचा किताब, तर सौरभ माने याने 'बेस्ट पोजर'चा किताब पटकावून सासवडच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या येरवडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात ही स्पर्धा रंगली होती. जिल्हाभरातून आलेल्या दांडग्या पैलवानांमध्ये वाघिरेच्या खेळाडूंनी सुरुवातीपासूनच आपला दबदबा कायम ठेवला. स्नायूंची रचना, पोजिंगची सफाई आणि स्टेजवरील आत्मविश्वास या जोरावर वाघिरेच्या खेळाडूंनी पंचांची आणि प्रेक्षकांची मने जिंकली.

स्पर्धेचे सर्वात मोठे आकर्षण ठरला तो राहुल शेटे. अचूक पोजिंग, कडक स्नायू आणि दमदार सादरीकरणाच्या जोरावर त्याने 'जिल्हा श्री २०२६'चा किताब आपल्या नावे केला. तर सौरभ माने याने आपल्या प्रभावी आणि कलात्मक पोजिंगने 'बेस्ट पोजर' किताबावर आपले नाव कोरले.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ४९ लाखांचा निधी सुपूर्द

आमदार राहुल कुल यांच्या वाढदिवसानिमित्त प्रेरणादायी उपक्रम!

■ दौंड (दै. संध्या)

तालुक्याचे आमदार ॲड. राहुल कुल यांच्या वाढदिवसानिमित्त 'आमदार राहुल दादा कुल मित्र मंडळ' यांच्यावतीने दुष्काळग्रस्त बांधवांच्या मदतीसाठी 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी'कडे ₹४९,००,००० (एकोणपन्नास लाख रुपये) इतक्या देणगीचे धनादेश जमा करण्यात आले.

आमदार ॲड. राहुल कुल यांच्या वाढदिवसानिमित्त दुष्काळग्रस्त बांधवांना मदत करण्याचे आवाहन केल्यानंतर हितचिंतक, नागरिकांनी, समाजबांधवांनी आणि कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यामुळे या सामाजिक उपक्रमातून एकूण ₹४९ लाखांची रक्कम जमा होऊ शकली.

या सर्व धनादेश आज राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय श्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. या देणगीचा वापर दुष्काळग्रस्त बांधवांच्या मदतीसाठी 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी'मार्फत केला जाईल. आमदार ॲड. राहुल कुल यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या उपक्रमात सहभागी होऊन दुष्काळग्रस्त बांधवांच्या मदतीसाठी हात पुढे करणाऱ्या सर्व हितचिंतकांचे व कार्यकर्त्यांचे 'आमदार राहुल दादा कुल मित्र मंडळ' यांच्यावतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहे. संकटकाळी समाजातील नागरिकांनी एकमेकांना साथ दिल्याने या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला.

"संकटाच्या काळात बळीराजा आणि दुष्काळग्रस्त बांधवांच्या मदतीसाठी धावून जाणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. माझ्या एका आवाहनाला प्रतिसाद देत मित्र मंडळाचे सर्व कार्यकर्ते आणि हितचिंतकांनी जो विश्वास व आपुलकी दाखवली, त्याबद्दल मी सर्वांचा मनःपूर्वक आभारी आहे. असे आमदार राहुल कुल यांनी सांगितले.



थोडक्यात पण महत्वाचे




अतिक्रमणांवरील कारवाईला गती देण्याचे अतिरिक्त आयुक्त सांडभोर यांचे निर्देश

पिंपरी : दैनिक संध्या

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील मधुकर पवळे सभागृह येथे अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवरील कारवाईचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस बांधकाम परवानगी विभागाचे सहशहर अभियंता सुनील बागवानी, कार्यकारी अभियंता, उपअभियंता, सर्व क्षेत्रीय अधिकारी आणि बीट निरीक्षक उपस्थित होते. बैठकीत महापालिकेच्या मालकीच्या भूखंडांवरील अतिक्रमणांचा आढावा घेण्यात आला. या भूखंडांवरील अतिक्रमणे निष्कासित करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव तयार करून पुढील आठवड्यात निष्कासनाची कारवाई करण्याच्या सूचना संबंधित क्षेत्रीय अधिकारी, नगररचना विभागाचे अधिकारी आणि बीट निरीक्षक यांना देण्यात आल्या. क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रातील सार्वजनिक पदपथांवरील अतिक्रमणे हटविण्याची नियमित कारवाई सुरू ठेवावी, असे निर्देश क्षेत्रीय अधिकारी आणि बीट निरीक्षकांना देण्यात आले. तसेच रस्त्यांवर झालेली अतिक्रमणे आणि अनधिकृत बांधकामांच्या ठिकाणी सुरू असलेली प्राथमिक स्वरूपातील कामे, विशेषतः फुटिंगची कामे, यांची तातडीने पाहणी करून संबंधित ठिकाणांची यादी तयार करावी आणि नियमानुसार निष्कासनाची कारवाई प्रस्तावित करावी, अशा सूचनाही देण्यात आल्या. दिवाळीच्या सुट्टीच्या कालावधीत शहरात अनधिकृत बांधकामे झाल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची क्षेत्रीय अधिकारी आणि बीट निरीक्षक यांनी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक ती कारवाई प्रस्तावित करावी, असे निर्देश देण्यात आले. शहरातील इमारतींच्या पार्किंगसाठी राखीव असलेल्या जागेचा व्यावसायिक कारणांसाठी होणाऱ्या अनधिकृत वापराबाबतही बैठकीत कारवाईचा आढावा घेण्यात आला. बांधकाम परवानगी विभागाचे कार्यकारी अभियंता आणि उपअभियंता यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी समन्वय साधून या प्रकरणांमध्ये आवश्यक कारवाई या आठवड्यात पूर्ण करावी, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी दिले.

नागपुरात अपघातांचे सत्र सुरूच

नागपूर: दैनिक संध्या



नागपूर शहरातील अंबाझरी तलाव परिसरात गुरुवारी पहाटेच्या सुमारास आणखी एका भीषण कार अपघाताची घटना घडली असून, या दुर्घटनेत एका व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. शहरातील अपघातांची मालिका कायम असतानाच घडलेल्या या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, गुरुवारी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास अंबाझरी तलावाजवळील स्वामी विवेकानंद स्मारकाजवळून एक कार जात होती. या कारचा क्रमांक 'एमएच ४९ सीडी ८३९०' असल्याचे समोर आले आहे. कार अत्यंत भरधाव वेगात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. नियंत्रण सुटल्यानंतर कार थेट रस्त्यावरील बॅरिकेडला जाऊन धडकली आणि त्यानंतर ती खाली नाल्यात कोसळली. या धडकेत कारचे मोठे नुकसान झाले असून, एकाचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती पुढे आली आहे. घटनेची माहिती मिळताच अंबाझरी पोलीस ठाण्यासह संबंधित यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या आणि पुढील कार्यवाही सुरू केली. हा अपघात अंबाझरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला आहे. सध्या कारमध्ये नेमके किती प्रवासी होते, मृत व्यक्ती कोण आहे आणि अपघाताचे नेमके कारण काय, याबाबत पोलिसांकडून सखोल चौकशी सुरू आहे.

विद्यार्थी,शिक्षक आणि पालक : बदलत्या नात्यांचा आरसा!

● शिक्षणाच्या सुविधा वाढल्या, तंत्रज्ञान बदलले ● विद्यार्थी समजून घेण्याची आपली संवेदनशीलता वाढली का?

आज शिक्षणव्यवस्थेत आमूलाग्र बदल होत आहेत. डिजिटल शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक तंत्रज्ञान आणि करिअरच्या विविध संधींमुळे विद्यार्थ्यांसमोर नवे क्षितिज खुले झाले आहे. मात्र, या बदलत्या प्रवासात विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्यातील नात्यांचा समतोल साधला जात आहे का? हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.



शिक्षणक्षेत्रात काम करताना विद्यार्थी,पालक आणि शिक्षक यांच्याशी होणाऱ्या संवादातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते.आज विद्यार्थ्यांकडे माहितीची साधने आहेत,पालकांकडे मुलांच्या भविष्याबाबत मोठ्या अपेक्षा आहेत आणि शिक्षकांकडे विद्यार्थ्यांना घडविण्याची जबाबदारी आहे; परंतु या तिन्ही घटकांमध्ये परस्परांना समजून घेण्याची प्रक्रिया अधिक दृढ होण्याची गरज आहे.

आजही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे मूल्यमापन प्रामुख्याने परीक्षेतील गुण आणि क्रमांकांवर केले जाते. मात्र,प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता, आवड,कौटुंबिक परिस्थिती आणि शिकण्याची पद्धत वेगळी असते. प्रत्येकाने डॉक्टर किंवा अभियंता होण्याची गरज नाही.उत्तम तंत्रज्ञ,कुशल कारागीर,उद्योजक, संशोधक,कलाकार आणि कौशल्याधारित व्यवसाय करणारे युवकही समाजाच्या विकासात तितकेच महत्त्वाचे योगदान देतात. त्यामुळे विद्यार्थ्यांची तुलना करण्याऐवजी त्यांच्यातील क्षमता ओळखून योग्य दिशा देणे हे शिक्षणाचे खरे उद्दिष्ट असले पाहिजे.

या प्रक्रियेत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.आज माहिती मिळविण्यासाठी अनेक साधने उपलब्ध असली,तरी विद्यार्थ्याला विचार करायला शिकविणे,योग्य-अयोग्य यातील फरक समजावून सांगणे आणि त्याच्यात आत्मविश्वास निर्माण करणे ही शिक्षकांची जबाबदारी आहे. मात्र,अध्यापनासोबत विविध प्रशासकीय कामे,अहवाल, ऑनलाइन माहिती संकलन आणि शैक्षणिक उपक्रम यांमुळे शिक्षकांवरील कामाचा ताण वाढत आहे.शिक्षकांकडून गुणवत्तापूर्ण शिक्षणाची अपेक्षा करताना त्यांना आवश्यक वेळ,स्वातंत्र्य आणि सन्मान देणेही तितकेच गरजेचे आहे. कारण शिक्षक हा केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणारा घटक नसून भावी पिढीच्या विचारविश्वाला आकार देणारा मार्गदर्शक आहे.

पालकांच्या अपेक्षाही समजून घेण्यासारख्या आहेत.मुलांनी चांगले शिकावे, स्वतःच्या पायावर उभे राहावे आणि सुरक्षित भविष्य घडवावे,ही प्रत्येक पालकाची इच्छा असते.मात्र,या अपेक्षांचे रूपांतर जेव्हा सततच्या तुलना आणि दबावात होते,तेव्हा मुलांच्या भावनिक विकासावर परिणाम होऊ शकतो. मुलांना आधुनिक सुविधा देण्याबरोबरच त्यांच्याशी संवाद साधणे,त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आणि अपयशाच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहणे अधिक महत्त्वाचे आहे.मुलांना प्रत्येक वेळी सल्ल्यापेक्षा समजून घेणारी व्यक्ती अधिक आवश्यक असते.

विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शिक्षक आणि पालक यांच्यातील समन्वय अत्यंत महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांच्या निकालात किंवा वर्तनात अडचणी निर्माण झाल्यास एकमेकांवर दोषारोप करण्यापेक्षा त्यामागील कारणे शोधली पाहिजेत.पालकसभा केवळ निकाल आणि तक्रारींपुरती मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या क्षमता,आवडी,अडचणी आणि भविष्यातील संधी यांवर चर्चा करणारे व्यासपीठ बनले पाहिजे. घर आणि शाळा या विद्यार्थ्यांच्या जडणघडणीतील दोन परस्परपूरक व्यवस्था आहेत,ही जाणीव दोन्ही बाजूंनी ठेवणे आवश्यक आहे.

बदलत्या काळात शिक्षणाने ज्ञानाबरोबर कौशल्य आणि संस्कारांनाही प्राधान्य दिले पाहिजे. तांत्रिक ज्ञान,संवादकौशल्य, निर्णयक्षमता,समस्या सोडविण्याची वृत्ती आणि प्रत्यक्ष काम करण्याची क्षमता या गुणांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात तंत्रज्ञानाचा वापर शिकविताना त्याचा विवेकपूर्ण आणि जबाबदार वापर करण्याची जाणीवही विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केली पाहिजे. प्रामाणिकपणा,श्रमप्रतिष्ठा, संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी ही मूल्ये शिक्षणाचा अविभाज्य भाग असली पाहिजेत.

आज शिक्षणव्यवस्थेला केवळ नवीन अभ्यासक्रम किंवा आधुनिक साधनांची गरज नाही,तर दृष्टिकोनातील बदलाचीही आवश्यकता आहे.पालकांनी मुलांची तुलना टाळावी,शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या भावविश्वाकडे लक्ष द्यावे आणि विद्यार्थ्यांनी केवळ गुणांच्या मागे न धावता ज्ञान, कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकासावर भर द्यावा. शिक्षणसंस्थांनीही संवाद, समुपदेशन,क्रीडा,कला आणि कौशल्याधारित शिक्षणाला अधिक संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

शिक्षणाचे यश केवळ परीक्षेतील निकाल किंवा मिळालेल्या पदवीवर ठरत नाही.प्रतिकूल परिस्थितीत उभे राहण्याची ताकद, स्वतःचे निर्णय घेण्याची क्षमता, अपयश स्वीकारण्याची तयारी आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी यांतूनही ते सिद्ध होते.कारण उद्याचा समाज केवळ आजच्या विद्यार्थ्यांच्या गुणांवर घडणार नाही; तर त्यांच्यामध्ये आपण रुजवलेले विचार,संस्कार, आत्मविश्वास आणि जीवनमूल्ये यांवर घडणार आहे. विद्यार्थी, शिक्षक आणि पालक या तिन्ही घटकांनी एकमेकांना समजून घेतले,तरच शिक्षणाला खऱ्या अर्थाने माणूस घडविण्याचे सामर्थ्य प्राप्त होईल.

लेखक-
विकास संजय निर्मळ
मुख्य कार्यकारी अधिकारी,
कृषि उद्योग मूल शिक्षण
संस्था, काऱ्हाटी,बारामती

रोजच्या आहारात कॅलिफोर्निया आल्मंड्ससारख्या सुकामेव्याचा समावेश महत्त्वाचा

■ पूणे (दै. संध्या)



मधुमेह असलेल्या जवळपास प्रत्येक दोन व्यक्तींपैकी एका व्यक्तीचे निदान झालेले नाही. १४ नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणारा जागतिक मधुमेह दिन पुन्हा एकदा लवकर कृती करण्याच्या महत्त्वावर लक्ष केंद्रित करतो. यावर्षीची संकल्पना "मधुमेहाबाबत लवकर कृती" ही मधुमेहाचे लवकर निदान करणे आणि त्याचा धोका कमी करण्यावर भर देते.

भारताला अनेकदा "जगाची मधुमेहाची राजधानी"असे म्हटले जाते. त्यामुळे लवकर कृती करण्याचे हे आवाहन भारतासाठी विशेष महत्त्वाचे आहे. २०२३ मध्ये The Lancet Diabetes & Endocrinology मध्ये प्रकाशित झालेल्या इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (ICMR)-INDIAB अभ्यासानुसार, भारतातील अंदाजे १०१ दशलक्ष लोक मधुमेहाने ग्रस्त आहेत, तर आणखी १३६ दशलक्ष लोकांना मधुमेह होण्यापूर्वीची स्थिती (प्री-डायबिटीज) आहे. याचा अर्थ, देशातील मोठ्या लोकसंख्येची स्थिती अशी आहे की, त्यांच्यासाठी लवकर कृती करणे महत्त्वाचे आहे. प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ, रिफाइंड कार्बोहायड्रेट्स आणि साखरेचे अधिक प्रमाण असलेला आहार ही समस्या आणखी वाढवतो.

म्हणूनच, रोजच्या आहारातील अन्नपदार्थांची निवड हा सुरुवात करण्याचा एक व्यावहारिक मार्ग आहे आणि कॅलिफोर्निया आल्मंड्ससारख्या सुकामेव्याचा या दैनंदिन आहारात समावेश करता येतो.

किल्ले स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव!



■ मसूर (दै. संध्या)

छत्रपती शिवाजी महाराजांचे अतुलनीय शौर्य, पराक्रम आणि स्वराज्यनिर्मितीचा गौरवशाली इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हणबरवाडी (ता. कराड) येथे दिवाळीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य किल्ले स्पर्धेचा नुकताच बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला. स्पर्धेचे यंदा पाचवे वर्ष होते. या स्पर्धेत सहभागी झालेल्या बालचिमुकल्यांनी आपल्या कल्पकतेतून आणि मेहनतीतून राजगड, रायगड, प्रतापगड यांसह विविध ऐतिहासिक गडकोटांच्या आकर्षक प्रतिकृती साकारल्या होत्या.

या स्पर्धेतील विजेते, उपविजेते तसेच सहभागी स्पर्धकांना रोख पारितोषिके, प्रमाणपत्र आणि शाल देऊन गौरविण्यात आले. विशेष म्हणजे, केवळ विजेत्यांचाच नव्हे तर स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविणाऱ्या प्रत्येक बालकाचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. त्यामुळे मुलांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. चित्रपट लेखक-दिग्दर्शक रामकुमार शेडगे, सातारा पोलीस दलातील सिद्धनाथ शेडगे, लता शेडगे आणि गोरखनाथ शेडगे यांच्या पुढाकारातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सिद्धनाथ शेडगे म्हणाले "छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, त्यांची युद्धनीती, दूरदृष्टी आणि स्वराज्य उभारणीचा इतिहास आजच्या तरुण पिढीला समजणे अत्यंत आवश्यक आहे.

"छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास हा प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी आहे. मुलांनी स्वतःच्या हातांनी किल्ले साकारताना केवळ एक प्रतिकृती तयार केलेली नसते, तर त्या माध्यमातून ते शिवरायांचा इतिहास, गडकोटांचे महत्त्व आणि स्वराज्याची संकल्पना समजून घेत असतात. गेली पाच वर्षे या उपक्रमाला मिळणारा प्रतिसाद निश्चितच आनंददायी असून भविष्यातही हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा मानस आहे." -रामकुमार शेडगे
चित्रपट लेखक दिग्दर्शक

स्कूल ऑफ लॉजिस्टिक्स'च्या स्थापनेसाठी ऑलकार्गो समूहाचा 'फ्युएल स्किलटेक अँड आंत्रप्रेन्योरशिप युनिव्हर्सिटी'शी करार

■ पुणे (दै. संध्या)

ऑलकार्गो समूहाने आपल्या सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमांतर्गत कार्यरत असलेल्या 'अवश्य फाउंडेशन'च्या माध्यमातून पुण्यातील 'फ्युएल स्किलटेक अँड आंत्रप्रेन्योरशिप युनिव्हर्सिटी'शी (एफएसयू) एक महत्त्वपूर्ण सामंजस्य करार केला आहे. या करारांतर्गत विद्यापीठाच्या पुणे कॅम्पसमध्ये 'ऑलकार्गो स्कूल ऑफ लॉजिस्टिक्स'ची स्थापना करण्यात येणार आहे.

ही संस्था ऑलकार्गो ग्रुपचे अध्यक्ष व संस्थापक आणि आयआयएम मुंबईच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष श्री. शशी किरण शेट्टी यांच्या दूरदृष्टीचे प्रतिबिंब आहे. या क्षेत्रात अर्थपूर्ण परिवर्तन घडवून आणणारे उद्याचे नेतृत्व घडवण्यावर त्यांचा विश्वास आहे. उद्दिष्ट आणि दूरदृष्टीच्या बळावर भारतातील सर्वात मोठ्या स्वदेशी बहुराष्ट्रीय लॉजिस्टिक्स कंपन्यांपैकी एक कंपनी उभारण्याचा त्यांचा प्रवास, ही 'भारतातून जागतिक स्तरावर' झेप घेणाऱ्या उद्योजकतेची एक प्रेरणादायी गाथा आहे. माननीय पंतप्रधानांच्या कौशल्य विकास मोहिमेला पाठबळ देण्यासाठी १५ कोटी रुपयांच्या योगदानासह, वंचित घटकांतील तरुणांमध्ये तीच अदम्य जिद्द रुजवून त्यांना यशस्वी व्यावसायिक करिअर घडवण्यास मदत करणे, हे या संस्थेचे ध्येय आहे.



ऑलकार्गो समूहाचे अध्यक्ष व संस्थापक आणि आयआयएम मुंबईच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष श्री. शशी किरण शेट्टी म्हणाले, "भारताच्या आर्थिक विकासात लॉजिस्टिक्स क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावते. तथापि, अनेक तरुणांसाठी—विशेषतः वंचित आणि ग्रामीण भागातील तरुणांसाठी - दर्जेदार शिक्षण आणि उद्योगांशी सुसंगत कौशल्यांचा अभाव हा या क्षेत्रात प्रवेश करण्यातील मोठा अडथळा ठरतो. पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसारख्या उच्च दर्जाच्या शिक्षणाची संधी न मिळालेल्या पात्र विद्यार्थ्यांना या क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी आवश्यक ज्ञान व अनुभव देऊन, 'ऑलकार्गो स्कूल ऑफ लॉजिस्टिक्स'च्या माध्यमातून ही दरी भरून काढण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. या उपक्रमामुळे प्रतिभावान तरुणांची नवी पिढी आपली क्षमता सिद्ध करेल आणि भारत व जागतिक लॉजिस्टिक्स तसेच पुरवठा साखळी परिसंस्थेत मोलाचे योगदान देईल, अशी आम्हाला अपेक्षा आहे." कौशल्य विकास आणि रोजगाराच्या माध्यमातून तरुणांचे सक्षमीकरण करण्याच्या समूहाच्या निरंतर ध्येयाशी सुसंगत असा हा उपक्रम आहे. वंचित घटकांतील आणि कुटुंबातून पहिल्यांदाच उच्च शिक्षण घेणाऱ्या तरुणांना उद्योगक्षेत्राशी निगडित शिक्षण व कौशल्ये प्रदान करणे, तसेच भारताच्या विस्तारणाऱ्या लॉजिस्टिक्स आणि पुरवठा साखळी क्षेत्रात करिअरचे नवे मार्ग खुले करणे हे या संस्थेचे उद्दिष्ट आहे.

विद्यार्थ्यांसाठी ऑटोमोटिव्ह सायबर सुरक्षा क्षेत्रात करिअरच्या सुवर्णसंधी

■ पुणे (दै. संध्या)

विद्यार्थ्यांमध्ये ऑटोमोटिव्ह सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे, उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून देणे तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचे व्यावहारिक ज्ञान देण्याच्या उद्देशाने 'ऑटोमोटिव्ह फ्यूचर अँड मोबिलिटी समिट २०२६' चे आयोजन डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सभागृह, वल्लभनगर, पिंपरी येथे करण्यात आले. या समिटमध्ये १,३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी विद्यार्थी, शिक्षणतज्ज्ञ, ऑटोमोबाईल उद्योगातील तज्ज्ञ आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रतिनिधी एकाच व्यासपीठावर आले. ऑटोमोबाईल उद्योगातील बदल, भविष्यातील मोबिलिटी, वाहन सुरक्षा, सायबर सुरक्षा आणि करिअरच्या नव्या संधी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच भविष्यात ऑटोमोबाईल क्षेत्रात सायबर सुरक्षेचे वाढते महत्त्व आणि या क्षेत्रातील करिअरच्या संधींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या समिटचे संयुक्त आयोजन ज्ञानप्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, केंद्रीय रस्ते परिवहन संस्था (CIRT) तसेच जगमंगल सोशल फाउंडेशनच्या प्रयास (PRAYAAS) या उपक्रमांतर्गत करण्यात आले. ऑटो सिफू (AutoSifu) हे या कार्यक्रमाचे तंत्रज्ञान भागीदार होते.

'तू आहेस ना'मधून सुप्रिया पिळगावकर आणि सिद्धार्थ बोडके एकत्र



■ मुंबई (दै. संध्या)

लव्ह फिल्म्सने आपल्या दुसऱ्या मराठी चित्रपटाची घोषणा केली असून, 'तू आहेस ना' या चित्रपटात सुप्रिया पिळगावकर आणि सिद्धार्थ बोडके प्रमुख भूमिकांमध्ये झळकणार आहेत. चित्रपटाच्या फर्स्ट लूक पोस्टरचे अनावरण करून निर्मात्यांनी ही घोषणा केली आहे. मानवी नातेसंबंधांवर भाष्य करणारी ही एक हृदयस्पर्शी कथा असून, एका अनपेक्षित नात्यामुळे दोन व्यक्तींचे आयुष्य एकत्र येते आणि त्यांच्या आयुष्याला अशा प्रकारे नवे वळण मिळते, ज्याची त्यांनी कधी कल्पनाही केलेली नसते.

'तू आहेस ना' या चित्रपटात सुप्रिया पिळगावकर मध्यवर्ती भूमिकेत दिसणार आहेत. मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टी, टेलिव्हिजन तसेच रंगभूमीवर अनेक दशकांचा अनुभव असलेल्या सुप्रिया पिळगावकर यांनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत विविध भूमिका साकारल्या आहेत. चित्रपटाची भावनिकदृष्ट्या प्रभावी कथा त्यांना विशेष भावली आणि त्यामुळेच हा प्रकल्प त्यांच्यासाठी खास ठरला. तर सिद्धार्थ बोडके यांच्यासाठी 'तू आहेस ना' हा लव्ह फिल्म्ससोबतचा दुसरा चित्रपट असून, यापूर्वी त्यांनी 'देवमाणूस'च्या माध्यमातून या टीमसोबत काम केले आहे. चित्रपटाच्या प्रवासाची सुरुवात एका महत्त्वपूर्ण टप्प्याने होत आहे. 'तू आहेस ना' या चित्रपटाचा जागतिक प्रीमियर गोव्यात आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित ५७ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (IFFI) २६ नोव्हेंबर रोजी गाला प्रीमियर विभागात होणार आहे. या महोत्सवातील या विभागात जागतिक प्रीमियर होणारा 'तू आहेस ना' हा एकमेव मराठी चित्रपट ठरणार आहे.

'तू आहेस ना' या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन दीपक गावडे यांनी केले आहे. त्यांच्या यापूर्वीच्या कामाची राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आणि महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कारांमध्ये दखल घेण्यात आली आहे.

चित्रपटाविषयी बोलताना सुप्रिया पिळगावकर म्हणाल्या, " 'तू आहेस ना' या चित्रपटाचा विषय आणि आजच्या काळातील त्याचे महत्त्व मला एक अभिनेत्री म्हणून विशेष भावले. चित्रपटात ज्या विषयाची मांडणी करण्यात आली आहे, त्यासोबतच मला साकारायला मिळणारी व्यक्तिरेखाही मला या प्रकल्पाचा भाग होण्यासाठी प्रेरित करणारी ठरली. IFFI मध्ये प्रेक्षक हा चित्रपट पाहणार आहेत, याचा मला खूप आनंद आहे."


आपला अनुभव सांगताना सिद्धार्थ बोडके म्हणाले, " 'तू आहेस ना' या चित्रपटाने मला भावनांच्या विविध छटा असलेली व्यक्तिरेखा साकारण्याचे आव्हान दिले.

एक अभिनेता म्हणून मला अशा प्रकारची भूमिका साकारण्याची खूप इच्छा होती. 'देवमाणूस'नंतर लव्ह फिल्म्ससोबतचा हा माझा दुसरा चित्रपट आहे. एका वेगळ्या आणि आव्हानात्मक कथेसाठी पुन्हा एकदा या टीमसोबत काम करण्याची संधी मिळाल्याने मी खूप उत्सुक होतो. या चित्रपटामुळे मला स्वतःमधील एका नव्या पैलूचा शोध घेता आला."



दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



पुणेकरांना शुद्ध व सुरक्षित पाणीपुरवठा करण्यासाठी २०० MLD जलशुद्धीकरण प्रकल्पाला गती द्या !

CWPRS ची ४ हेक्टर जागा हस्तांतरित करण्याबाबत केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांकडे महापौर मंजुषा नागपुरे यांचे आग्रही निवेदन

■ पुणे (दै. संध्या)

पुणे शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावून नागरिकांना शुद्ध, सुरक्षित आणि मुबलक पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्तावित असलेल्या २०० MLD क्षमतेच्या जलशुद्धीकरण प्रकल्पासाठी खडकवासला येथील केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन संस्था (CWPRS) यांची सुमारे ४ हेक्टर जागा पुणे महानगरपालिकेकडे तातडीने हस्तांतरित करावी, अशी आग्रही मागणी महापौर मंजुषा नागपुरे यांनी केंद्रीय जलशक्ती मंत्री मा. ना. श्री. सी. आर. पाटील आणि केंद्रीय जलशक्ती राज्यमंत्री मा. ना. डॉ. राज भूषण चौधरी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील आणि राज्यमंत्री डॉ. राज भूषण चौधरी हे आज पुणे दौऱ्यावर आले असता, केंद्रीय राज्यमंत्री तथा पुण्याचे खासदार मा. श्री. मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत महापौर मंजुषा नागपुरे यांनी त्यांची भेट घेऊन पुण्याच्या पाणीपुरवठ्याशी संबंधित महत्त्वाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. खडकवासला येथील केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन संस्थेमध्ये (CWPRS) आयोजित राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन,'जल संचय जन भागीदारी' आढावा बैठक तसेच वडगाव येथील सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या (STP) पाहणीदरम्यान ही महत्त्वपूर्ण चर्चा झाली. पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या १२ गावांमधील नागरिकांची पिण्याच्या पाण्याची वाढती गरज लक्षात घेता खडकवासला येथे २०० MLD क्षमतेचे आधुनिक जलशुद्धीकरण केंद्र उभारण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पाचा सुमारे ८९० कोटी रुपयांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) केंद्र शासनाच्या 'अर्बन चॅलेंज फंड' अंतर्गत यापूर्वीच मंजूर झाला आहे. मात्र, प्रकल्पाच्या उभारणीसाठी आवश्यक असलेली CWPRS ची सुमारे ४ हेक्टर जागा पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरित होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे या जागेच्या हस्तांतरणास जलशक्ती मंत्रालयाने तातडीने मंजुरी द्यावी, अशी मागणी महापौरांनी केली.

पुणे परिसरात दूषित पाण्यामुळे उद्भवलेल्या आरोग्यविषयक समस्यांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना शुद्ध व सुरक्षित पाणीपुरवठा करणे ही प्रशासनाची सर्वोच्च जबाबदारी आहे. यापूर्वी गुलियन-बॅरे सिंड्रोम (GBS) सारख्या गंभीर आजाराच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर भविष्यात अशा प्रकारचे आरोग्यविषयक धोके टाळण्यासाठी आधुनिक जलशुद्धीकरण प्रकल्प तातडीने कार्यान्वित होणे गरजेचे असल्याचे महापौर मंजुषा नागपुरे यांनी स्पष्ट केले.

यावेळी खासदार मुरलीधर मोहोळ यांनीदेखील पुणेकरांना शुद्ध पाणी मिळावे यासाठी यापूर्वी केंद्र शासनाकडे केलेल्या पत्रव्यवहाराचा संदर्भ देत या प्रकल्पाची आवश्यकता आणि जागा हस्तांतरणाचा विषय केंद्रीय मंत्र्यांकडे ठामपणे मांडला.

पुणे महानगरपालिका आयुक्त श्री. नवल किशोर राम आणि अतिरिक्त महापालिका आयुक्त श्रीमती पवनीत कौर यांनी जलशुद्धीकरण प्रकल्पाची तांत्रिक आवश्यकता, नियोजन आणि महत्त्व याबाबत सविस्तर सादरीकरण केले. तसेच वडगाव STP प्रकल्पाच्या पाहणीदरम्यान मुख्य अभियंता श्रीमती मनीषा शेकटकर, अधीक्षक अभियंता श्री. संजय गायकवाड आणि कार्यकारी अभियंता श्री. कराळे यांनी प्रकल्पाच्या सद्यस्थितीची माहिती व तांत्रिक बाबी सादर केल्या. महापौर मंजुषा नागपुरे यांनी मांडलेली आग्रही भूमिका, खासदार मुरलीधर मोहोळ यांचे भक्कम पाठबळ आणि महापालिका प्रशासनाचे अभ्यासपूर्ण सादरीकरण याची दखल घेत केंद्रीय मंत्री सी. आर. पाटील आणि राज्यमंत्री डॉ. राज भूषण चौधरी यांनी या विषयाची गांभीर्याने दखल घेत सकारात्मक प्रतिसाद दिला. तसेच जागा हस्तांतरणासह प्रकल्पासंदर्भात लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत आश्वासन दिले. पुणेकरांना शुद्ध, सुरक्षित आणि पुरेसा पाणीपुरवठा मिळावा, यासाठी महापौर मंजुषा नागपुरे यांचा केंद्र शासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू असून, हा महत्त्वपूर्ण प्रकल्प मार्गी लावण्यासाठी पुणे महानगरपालिका प्रशासन कटिबद्ध आहे.



थोडक्यात पण महत्वाचे



सहकार क्षेत्राच्या सक्षमीकरणासाठी आणि जिल्हा बँकांच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण संवाद!

बारामती : दैनिक संध्या

राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) यांच्या वतीने पुणे येथील हॉटेल सेंट लॉरीन, कोरेगाव पार्क येथे राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांसाठी 'व्यवसाय वृद्धी आणि कार्यात्मक कार्यक्षमता' या विषयावर आयोजित कार्यशाळेस विशेष अतिथी म्हणून जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा.डॉ.दिगंबर दुर्गाडे सर यांना उपस्थित राहण्याची संधी मिळाली. यावेळी राज्यातील विविध जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. उपस्थित अधिकाऱ्यांशी संवाद साधताना जिल्हा बँकांसमोरील विविध अडचणी, आर्थिक आव्हाने, व्यवसायवृद्धीच्या संधी आणि कार्यप्रणाली अधिक सक्षम करण्याबाबत दुर्गाडे सरांनी यावेळी सविस्तर चर्चा केली. शेतकरी, सहकार आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका अधिक सक्षम, आधुनिक, पारदर्शक आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणे ही काळाची गरज आहे. ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत बँकिंग सेवा पोहोचविण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, व्यावसायिक दृष्टिकोन आणि सक्षम व्यवस्थापन यावर विशेष भर देण्याची आवश्यकता आहे. सहकार क्षेत्रातील अडचणी समजून घेत त्यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी अशा विचारमंथनातून निश्चितच सकारात्मक दिशा मिळेल, असा विश्वास आहे. सहकारातून समृद्धी, सक्षम जिल्हा बँका आणि आर्थिकदृष्ट्या सशक्त शेतकरी हेच आपल्या विकासाचे ध्येय!

ज्येष्ठ पेन्शनधारकांसाठी घरबसल्या डिजिटल जीवन प्रमाणपत्राची सुविधा

बारामती : दैनिक संध्या

केंद्र व राज्य सरकारी सेवानिवृत्त कर्मचारी तसेच पेन्शनधारकांना दरवर्षी पेन्शन सुरू ठेवण्यासाठी डिजिटल जीवन प्रमाणपत्र (Digital Life Certificate) सादर करणे आवश्यक असते. यासाठी भारतीय डाक विभाग आणि इंडिया पोस्ट पेमेंट बँकेच्या वतीने 'Nationwide Digital Life Certificate Campaign 5.0' अंतर्गत विशेष मोहीम राबविण्यात येत असून, ज्येष्ठ नागरिकांना घरबसल्या जीवन प्रमाणपत्र काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नोव्हेंबर महिन्यात राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेदरम्यान अनेक पेन्शनधारकांना बोटांचे ठसे स्पष्ट न उमटणे किंवा बायोमेट्रिक पडताळणीमध्ये अडचणी येत असल्याने जीवन प्रमाणपत्र सादर करताना त्रास होत होता. ही समस्या लक्षात घेऊन फेस ऑथेंटिकेशन अर्थात चेहरा ओळख पडताळणीद्वारे डिजिटल जीवन प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. ही सेवा केवळ ७० रुपयांमध्ये उपलब्ध असून, बारामती टपाल विभागांतर्गत बारामती, इंदापूर, सासवड, दौंड आणि शिरूर तालुक्यांतील ग्रामीण भागातील शाखा डाकघर, उपडाकघर, बारामती मुख्य डाकघर तसेच पोस्टमन व ग्रामीण डाक सेवकांच्या माध्यमातून दिली जाणार आहे. पेन्शनधारकांना पोस्टमन अथवा ग्रामीण डाक सेवकांना घरी बोलावून किंवा जवळच्या पोस्ट ऑफिसमध्ये जाऊन ऑनलाइन पद्धतीने डिजिटल जीवन प्रमाणपत्र सादर करता येणार आहे. यासाठी आधार क्रमांक, पेन्शन पेमेंट ऑर्डर (PPO No.) आणि मोबाईल क्रमांक ही माहिती आवश्यक आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी सर्व केंद्र, राज्य, रेल्वे तसेच विविध विभागांच्या पेन्शनधारकांनी जवळच्या पोस्टमन अथवा ग्रामीण डाक सेवकांशी संपर्क साधावा, असे आवाहन अधीक्षक डाकघर, बारामती विभाग केतन डी. शित्रे आणि इंडिया पोस्ट पेमेंट बँकेचे शाखा व्यवस्थापक स्वप्नील सावंत यांनी केले आहे.

दादर रेल्वे स्थानकालाच 'चैत्यभूमी' नाव द्या; रिपब्लिकन पक्षाची आग्रही मागणी



पुणे : दैनिक संध्या

दादर रेल्वे स्थानकाला 'चैत्यभूमी' हे नाव देण्याची घोषणा करून प्रत्यक्षात रेल्वे स्थानकाऐवजी मेट्रो स्टेशनला हे नाव देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतल्याने आंबेडकरी जनतेची फसवणूक झाली आहे. सरकारची ही भूमिका निषेधार्ह असून, दादर रेल्वे स्थानकाचेच नामकरण 'चैत्यभूमी' असे करण्यात यावे, अशी आग्रही मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांनी केली आहे. आम्ही महायुतीत असलो तरी सरकारने आम्हाला गृहीत धरू नये, असा इशाराही पक्षाच्या नेत्यांनी दिला. दादर रेल्वे स्थानकाऐवजी मेट्रो स्टेशनला 'चैत्यभूमी' नाव दिले जाणार असल्याचे स्पष्ट होताच पुणे शहर रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आंबेडकर पुतळा परिसरात राज्य सरकारच्या निर्णयाचा तीव्र निषेध करण्यात आला.

पुणे जिल्ह्यातील ५ हजार ७९५ शेतकऱ्यांना आतापर्यंत ६५ कोटी ११ लाख रुपयांचे अनुदान वितरित

■ जेजुरी (दै. संध्या)

दुष्काळसदृश परिस्थितीत शेतीची कामे वेळेत पूर्ण करण्याबरोबरच उत्पादन खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी आधुनिक कृषी यंत्रसामग्री महत्त्वाची ठरत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कृषी यांत्रिकीकरण योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांनी केले आहे.

जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीत शेतीचा वाढता खर्च, मजुरांची कमतरता आणि उपलब्ध साधनसामग्रीचा कार्यक्षम वापर या पार्श्वभूमीवर कृषी यांत्रिकीकरण योजना शेतकऱ्यांसाठी आधार ठरत आहे. शेतीची कामे कमी वेळेत, कमी श्रमात आणि कमी खर्चात करण्यासाठी कृषी यंत्रसामग्री उपलब्ध करून देणाऱ्या या योजनेंतर्गत पुणे जिल्ह्यातील ५ हजार ७९५ शेतकऱ्यांना आतापर्यंत ६५ कोटी ११ लाख रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे. ही रक्कम थेट शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यांवर जमा करण्यात आली आहे. दुष्काळसदृश परिस्थितीत पिकांचे व्यवस्थापन, मशागत, पेरणी, फवारणी आणि काढणीची कामे वेळेत पूर्ण करणे शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे असते. अशा वेळी आधुनिक कृषी यंत्रांचा वापर उपयुक्त ठरत असून, कृषी यांत्रिकीकरणामुळे श्रम, वेळ आणि उत्पादन खर्चात बचत होण्यास मदत होत आहे. जिल्ह्यात आतापर्यंत १ हजार ८८९ शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, ३६४ शेतकऱ्यांना पॉवर टिलर, २ हजार ९०२ शेतकऱ्यांना कृषी यंत्र-अवजारे, ६०० शेतकऱ्यांना कृषी अवजारे, १३ शेतकऱ्यांना किसान ड्रोन, तर २७ शेतकऱ्यांना कंबाईन हार्वेस्टरसाठी अनुदान देण्यात आले आहे. मशागतीपासून काढणीपर्यंत यंत्रांचा उपयोगव- ट्रॅक्टर आणि पॉवर टिलरच्या वापरामुळे शेतीची विविध कामे सुलभ होण्यासोबतच मजुरीवरील खर्च कमी होण्यास मदत होत आहे. पॉवर टिलरचा वापर उसाची बांधणी, फळबागांमध्ये भर लावणे, तणनियंत्रण आणि मशागतीसाठी केला जातो. तसेच ट्रॅक्टरचलित कल्टिव्हेटर, नांगर, ब्लोअर, ट्रॉली, चाफ कटर, ऊस पाचट व्यवस्थापन यंत्र, बेलर मशीन, शुगरकेन श्रेडर-कटर, पेंडी श्रेशर, फवारणी आणि पेरणी यंत्रांसाठीही अनुदान दिले जाते. ६०० कृषी अवजारे बँकांना २४ कोटींचे अनुदान – कृषी अवजारे बँक योजनेंतर्गत शेतकऱ्यांना १० ते २५ लाख रुपयांपर्यंतची ट्रॅक्टर व कृषी अवजारे खरेदी करता येतात. यासाठी ४ ते १० लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येते. चालू वर्षात जिल्ह्यातील ६०० कृषी अवजारे बँकांना एकूण २४ कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार आधुनिक कृषी यंत्रांचा वापर करण्याची सुविधा उपलब्ध होत आहे. किसान ड्रोनद्वारे फवारणीला प्रोत्साहन – किसान ड्रोन योजनेंतर्गत १३ शेतकऱ्यांना ड्रोन खरेदीसाठी ५७ लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे. ड्रोनच्या माध्यमातून ऊस, अन्य पिके आणि फळबागांवर फवारणी करता येते. दुष्काळी परिस्थितीत पिकांवरील पाण्याचा ताण कमी करण्यासाठी युरिया व पोटॅशची फवारणी करण्यासाठीही ड्रोनचा उपयोग होतो. कंबाईन हार्वेस्टरच्या माध्यमातून गहू, हरभरा, सोयाबीन, मका आदी पिकांची काढणी कमी वेळेत करता येते.

मुक्या जीवांसाठी संवेदनशील उपक्रम

■ कवठे येमाई (दै. संध्या)

यावर्षी एकीकडे वाढते तापमान, पाण्याची टंचाई आणि दुष्काळसदृश परिस्थितीमुळे राज्यात माणसांनाच पाणी मिळणे कठीण होत असताना, दुसरीकडे मुक्या पक्ष्यांची भूक आणि तहान ओळखून त्यांच्यासाठी पुढे सरसावणारे हातही समाजात आहेत. धनकवडी येथील पुण्याई नगर परिसरात वरिष्ठ जनसेविका तथा पोलीस मित्र संघाच्या राष्ट्रीय महिला अध्यक्ष श्रीमती वर्षाताई नाईक यांनी अशाच माणुसकीचे दर्शन घडविले आहे. पुण्याई नगर परिसरात मागील महिनाभरापासून भूक आणि तहानेने व्याकुळ होणाऱ्या कबुतरांसाठी वर्षाताई नाईक नियमितपणे अन्न व पाण्याची व्यवस्था करीत आहेत. उन्हाच्या झळा सोसणाऱ्या या मुक्या जीवांना अन्नाचा घास आणि पाण्याचा घोट मिळावा, या भावनेतून त्यांनी हा संवेदनशील उपक्रम हाती घेतला आहे.

रूपेश शिवरकर आणि गणेश जाधव जे .आर .डी . टाटा पुरस्कार २०२६ ने सन्मानित

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते 'फास्टेस्ट ग्रोइंग आंत्रप्रेन्योर ऑफ द इयर' पुरस्कार प्रदान

■ लोणी काळभोर (दै. संध्या)

रूपेश शिवरकर आणि गणेश जाधव यांच्या संयुक्त भागीदारीतून उभ्या राहिलेल्या मायक्रोटेक पॉलिमर्स या उद्योगाने राष्ट्रीय स्तरावर मानाचा सन्मान पटकावला आहे. भारतीय युवा शक्ती ट्रस्ट तर्फे प्रदान करण्यात येणाऱ्या प्रतिष्ठेच्या 'जे .आर .डी. टाटा पुरस्कार २०२६' मधील 'फास्टेस्ट ग्रोइंग आंत्रप्रेन्योर ऑफ द इयर' या श्रेणीतील पुरस्काराने कंपनीचा गौरव करण्यात आला. नवी दिल्ली येथील हॉटेल शांग्री-ला इरोस येथे आयोजित समारंभात केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सन २०१९ मध्ये रूपेश शिवरकर आणि गणेश जाधव यांनी अवघ्या ३०० चौरस फुटांच्या छोट्याशा जागेतून या उद्योगाची सुरुवात केली. मर्यादित साधनसामग्री, जिद्द, मेहनत आणि दूरदृष्टीच्या जोरावर त्यांनी अल्पावधीत उल्लेखनीय प्रगती साधली. आज कंपनी पफ/सँडविच पॅनेल उद्योग, प्लॅन्ट टिश्यू कल्चर लॅब आणि



गारमेंट इंडस्ट्रीसाठी विविध प्लास्टिक उत्पादनांची निर्मिती करते. देशांतर्गत २१ राज्यांमध्ये तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर १० देशांमध्ये मिळून १५० हून अधिक ग्राहकांना कंपनी उत्पादने पुरवित आहे. निर्यात व्यवसायातही कंपनीने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

या पुरस्कार सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष प्रा. एस. महेंद्र देव आणि राज्यसभा खासदार विजय चिंताकायला उपस्थित होते. तसेच BYST च्या संस्थापक व व्यवस्थापकीय विश्वस्त सौ. लक्ष्मी वेंकटरमण वेंकटेशन यांच्यासह उद्योग, सामाजिक, आर्थिक आणि विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवर उपस्थित होते.

या यशस्वी उद्योजकीय प्रवासात BYST चे मेंटर सौमित्र घोटीकर यांचे मार्गदर्शन अत्यंत मोलाचे ठरले. व्यवसायवृद्धी, योग्य दिशा, नियोजन आणि विविध व्यावसायिक आव्हानांवर मात करण्यासाठी त्यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन रूपेश शिवरकर आणि गणेश जाधव यांच्यासाठी प्रेरणादायी ठरले. त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल दोन्ही भागीदारांनी विशेष कृतज्ञता व्यक्त केली.

या उदयोगसाठी दोन्ही भागीदारांच्या कुटुंबीयांनी दिलेली भक्कम साथ, वेळोवेळी केलेले प्रोत्साहन आणि कठीण प्रसंगांत दिलेला आधार अत्यंत मोलाचा ठरला. अनेक आव्हाने आणि संघर्षांवर मात करत उद्योगाची वाटचाल सुरू ठेवताना कुटुंबीयांच्या पाठिंब्यामुळेच हा प्रवास अधिक बळकट झाला. त्यामुळे हा पुरस्कार केवळ व्यावसायिक यशाचा नसून दोन्ही कुटुंबांच्या त्यागाचा, विश्वासाचा आणि सहकार्याचाही सन्मान असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. या सन्मानाबद्दल रूपेश शिवरकर आणि गणेश जाधव यांनी हा पुरस्कार त्यांच्या संयुक्त मेहनतीचा, BYST चे मार्गदर्शक, संपूर्ण टीमचे योगदान, ग्राहकांनी दाखवलेला विश्वास आणि हितचिंतकांच्या सहकार्याचा गौरव असल्याचे सांगितले. भविष्यात जागतिक बाजारपेठेत भारतीय उत्पादनांची ओळख अधिक मजबूत करण्याचा आणि उद्योगाचा विस्तार करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

पाठांतरापेक्षा विचारप्रवर्तक पिढी घडवा : राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठातर्फे शालेय शिक्षणावरील 'रिजनल रिसर्च सिम्पोजियम ऑन पीबीएल' या आंतरराष्ट्रीय परिषदेचे दिमाखात उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)

'पारंपरिक शिक्षणपद्धती ऐवजी विद्यार्थ्यांमध्ये प्रश्न विचारण्याची, स्वतंत्रपणे विचार करण्याची आणि स्वतः समस्यांवर उपाय शोधण्याची क्षमता विकसित करणे ही काळाची गरज आहे. प्रकल्प व समस्याधारित शिक्षण ही नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची खरी ताकद असून, त्यातून केवळ नोकरी शोधणारे नव्हे, तर रोजगार निर्माण करणारे उद्योजक घडतील,' असे प्रतिपादन शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.

शालेय शिक्षण, उच्च शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील समन्वय वाढविण्याच्या उद्देशाने सोलापूर येथील एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठातर्फे आयसर पुणे येथे चौथ्या 'रिजनल रिसर्च सिम्पोजियम ऑन प्रोजेक्ट अँड प्रॉब्लेम-बेस्ड लर्निंग' या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन आयसर पुणे येथे करण्यात आले आहे. शालेय शिक्षणावरील प्रादेशिक संशोधन परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे



शिक्षणासह सर्वच क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या (एआय) तंत्रज्ञानाचा वापर अटळ झाला आहे. या नवतंत्रज्ञानाने विद्यार्थ्यांची सृजनशीलता वाढवली पाहिजे, त्याला यंत्रवत बनवता कामा नये. फक्त शिक्षकच विद्यार्थ्यांना मूल्यशिक्षणातून एआयचा वापर मानवाच्या कल्याणासाठी आणि देशाच्या प्रगतीसाठी कसा करावा हे शिकवू शकतात. 'एमआयटी'सारख्या अग्रगण्य शैक्षणिक संस्थांमधील शिक्षकांकडे विद्यार्थ्यांच्या ऊर्जेला सकारात्मक दिशा देण्याची ताकद आहे.

- डॉ. पंकज भोयर, शालेय शिक्षण राज्यमंत्री

होत्या तर पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील विशेष अतिथि म्हणून उपस्थित होते. डेन्मार्कमधील अलबोर्ग विद्यापीठाच्या युनेस्को पीबीएल सेंटरच्या संचालिका प्रा. क्झियानग्यून डू, अगस्त्या इंटरनॅशनल फाऊंडेशनचे कार्यकारी उपाध्यक्ष के. त्यागराजन, एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचे संस्थापक-कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी आणि संचालक राघवेंद्र चाटे आदी उपस्थित होते.

डॉ. पंकज भोयर म्हणाले "'पूर्वेचे ऑक्सफर्ड ऑफ ईस्ट' अशी ओळख असलेल्या पुण्याचा शैक्षणिक वारसा समृद्ध करण्यात 'एमआयटी' शिक्षण संस्थेचे योगदान मोलाचे असून, विज्ञान आणि अध्यात्म यांना एकत्र आणून शिक्षण देण्याच्या प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या स्वप्नपूर्तीकडे एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. 'विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष समस्या देऊन त्यावर उपाय शोधण्याची संधी दिल्यास त्यांची जिज्ञासा आणि चिकित्सक विचारक्षमता वाढेल. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि रोबोटिक्सच्या युगात शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांना सृजनशील बनविण्यासाठी करावा," असे आवाहन त्यांनी केले.

गजानन पाटील यांनी समस्या-आधारित शिक्षणाचा विस्तार अभियांत्रिकी आणि उच्च शिक्षणापुरता मर्यादित न ठेवता शालेय स्तरापर्यंत करण्याची आवश्यकता व्यक्त केली. त्यासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण आणि क्षमता बांधणी महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रा. स्वाती कराड चाटे यांनी शालेय शिक्षण आणि उच्च शिक्षण यांच्यातील दरी भरून काढण्यासाठी संशोधन व नावीन्यपूर्ण विचारांची रुजुवात शालेय स्तरापासूनच होण्याची गरज व्यक्त केली. "समस्या-आधारित शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार, सर्जनशीलता, सहकार्याची भावना आणि संवादकौशल्य विकसित होईल. शिक्षणपद्धती ही भारतीय समाजाच्या गरजा आणि समस्यांशी सुसंगत असावी. जगातील सर्वोत्तम शैक्षणिक पद्धती स्वीकारताना भारतीय संस्कृती आणि मूल्यांचे जतनही झाले पाहिजे," असे त्यांनी नमूद केले. प्रा. क्झियानग्यून डू यांनी शाश्वत शैक्षणिक बदल आणि विद्यार्थ्यांच्या विकसनात समस्या-आधारित शिक्षणाचे महत्त्व विशद केले. के त्यागराजन यांनी शिक्षणशास्त्रात समस्याधारित शिक्षणाला वाढती पसंती अधोरेखित केली.

या परिसंवादात डेन्मार्क, दक्षिण आफ्रिका, सिंगापूर आणि भारतातील शिक्षणतज्ज्ञ सहभागी झाले आहेत. समस्या व प्रकल्पाधारित शिक्षणाच्या जागतिक व भारतीय सर्वोत्तम पद्धतीविषयी विचारमंथन याठिकाणी केले जाणार आहे. प्रत्यक्ष कृती, अनुभव, संशोधन आणि सहकार्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकण्याची संधी देणे, हा या परिसंवादाचा प्रमुख उद्देश आहे. कुलसचिव डॉ. कृष्णकेदार गुमास्ते यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि श्रीप्रिया प्रतिनिधि यांनी सूत्रसंचालन केले.